| धाराशिव | वर्ष २६ वे | अंक ११५ वा | शनिवार दिनांक ११ जुलै २०२६ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹
RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सेंट्रींगच्या प्लेटा व दांड्याची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- ग्रामीण पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी अतुल तुकाराम सोनवणे, वय ३६ वर्षे, व्यवसाय सेंट्रीगकाम रा. नारायण कॉलनी, काकडे प्लॉट, धाराशिव ता. जि.धाराशिव यांचे कौडगाव तांड्याजवळील पुलावरील कामाचे लोखंडी सेंट्रींगच्या ७ प्लेटस व लोखंडी जॉकच्या १५ दांड्या असा एकुण ५१,००० किंमतीचा माल अज्ञात व्यक्तीने चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अतुल सोनवणे यांनी दि.०९.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव ग्रामीण पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### उपळयातून मोटारसायकलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- आनंदनगर पोलीस ठाणे : फिर्यादी नामे-गणेश टोपा पवार, वय ३० वर्षे, रा. घांटग्री ता. जि. धाराशिव यांची अंदाजे २०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि. ०१.०६.२०२६रोजी जुना उपळा रोड शिवनारायणी चौक आनंदी हॉस्टेल धाराशिव येथुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-गणेश पवार यांनी दि.०९.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन आनंदनगर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### मद्यपी चालकावर गुन्हा

धाराशिव (प्रतिनिधी)- तामलवाडी पोलीस ठाणे अंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, लक्ष्मण वय ३२ वर्षे, रा. उळे ता. द. सोलापूर जि. सोलापूर हे दि.०९.०७.२०२६ रोजी आपल्या ताब्यातील वाहन क्र एमएच १३ डीके ०६४३ ही टोलनाका तामलवाडी येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द तामलवाडी पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

धाराशिव शहर पोलीस ठाणे अंतर्गत दत्तात्रय रा.देवळाली ता. जि. धाराशिव हे दि.०९.०७.२०२६ रोजी १८.०६ आपल्या ताब्यातील वाहन क्र एमएच १६ एके ०६४२ ही अमर पॅलेस हॉटेल बेंबळी रोड धाराशिव येथे मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द धाराशिव शहर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

आनंदनगर पोलीस ठाणे अंतर्गत श्रीकांत रा. शाहुनगर धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.०९.०७.२०२६ रोजी १९.३० आपल्या ताब्यातील वाहन क्र एमएच १३ बीडी ८५९७ ही महालक्ष्मी इडली सेंटर समोर मद्यधुंद मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसान आनंदनगर पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## दोन हजार शिक्षकांचा आंदोलनात सहभाग

धाराशिव (शीला उंबरे-पेंढरकर)- 'अशैक्षणिक कामे बंद करा'', 'आमच्या हक्काची जुनी पेन्शन लागू करा'' अशा घोषणांनी गुरुवारी जिल्हा कचेरीचा परिसर दणाणून गेला. बूथ बीएलओ च्या कामातून कायमची सुटका आणि जुनी पेन्शन योजना लागू करावी, या प्रमुख मागण्यांसाठी जिल्ह्यातील शिक्षकांनी गुरुवारी 'कामबंद'' पुकारत थेट रस्त्यावर उतरून एल्गार पुकारला. शाळा बंद असल्याने सकाळी विद्यार्थ्यांना घराकडे माघारी परतावे लागले. शाळा बंद ठेवल्यास वेतन कपात करण्याचा इशारा शिक्षण विभागाने दिल्यानंतरही आंदोलनात दोन हजारांच्या आसपास शिक्षक सहभागी झाले होते. कार्यरत शिक्षकांना टीईटी अनिवार्यता, पदोन्नतील अन्याकारक अटी, बीएलओ कामांपासून सुटका या मागण्यासाठी महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समितीने राज्यव्यापी शाळा बंद समितीची हाक दिली होती. त्याला धाराशिव जिल्हा शिक्षक संघटना समन्वय समितीने प्रतिसाद देत गुरुवारी जिल्हा कचेरीसमोर दुपारी १ ते ४ या वेळेत जोरदार धरणे आंदोलन केले. गुरुवारी सकाळपासून जिल्हाभरातील शिक्षक वाहनांनी शहरात दाखल झाले होते. प्रशासन शिक्षकांवर मानसिक दडपण आणत आहे. शिक्षकांना केवळ अध्यापनाच्या कामावर लक्ष केंद्रित करता यावे, यासाठी त्यांना बीएलओच्या कामातून मुक्त करावे, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली. जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिक्षक आपल्या मागण्यांसाठी आक्रमक झाले असताना दुसरीकडे ग्रामीण भागातील शाळा बंद असल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय झाली. अनेक विद्यार्थी शाळेच्या आवारातून परत घरी गेले.

## धाराशिवच्या ग्रामीण रुग्णालयांची दुरवस्था; मोफत उपचारांचा फक्त फलक, प्रत्यक्षात गरीबांच्या खिशावर डल्ला!

धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- जिल्ह्यातील अनेक ग्रामीण रुग्णालयांची अवस्था दिवसेंदिवस चिंताजनक बनत चालली आहे. शासनाकडून सर्वांसाठी मोफत आरोग्य सेवा अशा घोषणा केल्या जात असल्या तरी प्रत्यक्षात अनेक रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची कमतरता, औषधांचा तुटवडा, आवश्यक वैद्यकीय उपकरणांचा अभाव आणि वेळेवर उपचार न मिळाल्याने गोरगरीब जनतेचे मोठे हाल होत आहेत.

रुग्णालयाच्या दारात मोफत उपचारांचे फलक दिसतात; मात्र प्रत्यक्षात रुग्णांना औषधे बाहेरून विकत घ्यावी लागतात, तपासण्या खासगी लॅबमध्ये कराव्या लागतात आणि गंभीर रुग्णांना खाजगी रुग्णालयात धाव घ्यावी लागते. त्यामुळे मोफत उपचार ही केवळ कागदावरील घोषणा ठरत असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे.

ग्रामीण भागातील शेतकरी, मजूर, ज्येष्ठ नागरिक आणि गरीब कुटुंबांना आर्थिक परिस्थितीमुळे सरकारी रुग्णालयांचा आधार घ्यावा लागतो. मात्र तेथे समाधानकारक सेवा न मिळाल्याने त्यांना हजारो रुपये खर्च करून खासगी रुग्णालयांचा दरवाजा ठोठवावा लागतो. परिणामी अनेक कुटुंबे कर्जबाजारी होत आहेत.

धाराशिव जिल्ह्यातील ग्रामीण आरोग्य व्यवस्था सक्षम करणे ही काळाची गरज आहे. अन्यथा सरकारी उपचार मोफत ही घोषणा फक्त फलकापुरतीच मर्यादित राहील आणि गरीब जनतेला खाजगी रुग्णालयांच्या खर्चाचा मोठा बोजा सहन करावा लागेल.

## यूपी पोलिसांची उमरग्यात मोठी कारवाई; गँगस्टरची २५ कोटींची मालमत्ता सील

उमरगा(प्रतिनिधी)-उत्तर प्रदेशातील कुप्रसिद्ध गँगस्टर विजय मिश्रा याच्या कथित गुन्हेगारी साम्राज्यावर युपी प्रशासनाने मोठा घाव घातला आहे. महाराष्ट्रातील उमरगा तालुक्यातील जकेकुर येथील तब्बल २० ते २५ कोटी रुपयांच्या दाल मिलवर जप्तीची (कुर्क) धडक कारवाई करण्यात आली. गुन्हेगारीच्या पैशातून उभारण्यात आलेल्या एकूण १०० कोटी २५ लाख रुपयांच्या मालमत्तेवर ही कारवाई सुरू होताच उमरगा औद्योगिक वसाहतीत एकच खळबळ उडाली असून, अवैध मार्गाने संपत्ती उभी करणाऱ्यांचे धाबे दणाणल्याची चर्चा रंगली आहे.

उत्तर प्रदेशातील भदोही जिल्ह्याच्या जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांनी २ जुलै २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, 'यूपी गँगस्टर क्ट'च्या कलम १४(१) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली. त्यानुसार मंगळवारी (दि. ७) उमरगा-लातूर रोडवरील जकेकुर औद्योगिक वसाहतीतील प्लॉट क्रमांक बी-१०२ वरील 'लल्ली ग्रो इंडस्ट्रीज एलएलपी' या पल्स (दाल) मिलच्या मुख्य प्रवेशद्वारावर प्रशासनाने अधिकृत जप्तीचा फलक लावला.

चौकशीत विजय मिश्रा याने कथित गुन्हेगारी उत्पन्नातून ही मालमत्ता आपला जावई मुकेश तिवारी व मुलगी गरीमा तिवारी (रा. विलेपार्ले, मुंबई) यांच्या नावावर खरेदी केल्याचे नमूद करण्यात आले आहे. सुमारे ५ हजार ५० चौरस मीटर क्षेत्रावरील या प्रकल्पाची किंमत २० ते २५ कोटी रुपयांच्या घरात असल्याचा अंदाज आहे.

उत्तर प्रदेशातील गोपीगंज पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १०९/२०२२ अंतर्गत हे प्रकरण नोंद आहे. या गुन्ह्यात गँगलीडर विजय रामदेव मिश्रा (रा. खपटिहा, जि. प्रयागराज) याच्याविरुद्ध 'उत्तर प्रदेश गँगस्टर आणि समाजविघातक कृत्ये (प्रतिबंध) अधिनियम' (यूपी गँगस्टर क्ट) च्या कलम ३(१) अन्वये कारवाई सुरू आहे. तपासादरम्यान विजय मिश्रा याने कथित गुन्हेगारी कारवाया आणि बेकायदेशीर आर्थिक व्यवहारांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर संपत्ती उभारल्याचा आरोप आहे.

त्यानंतर संबंधित मालमत्तेचा शोध घेऊन ती नातेवाईकांच्या नावावर असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला होता.

भदोही जिल्ह्याच्या जिल्हा न्यायदंडाधिकाऱ्यांनी २ जुलै २०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार, उमरगा तालुक्यातील जकेकुर चौरस्ता येथील दाल मिलचा समावेश करून ही जप्तीची प्रक्रिया राबविण्यात येत आहे.

## धाराशिव शहराच्या विकासाला नवी गती

**धाराशिव ते सारोळा चौपदरीकरण, बंदिस्त गटारे आणि स्मार्ट स्ट्रीटची कामे मार्गी लागणार, एमएसआयडीसीकडून सुधारित आराखड्यास मंजुरी; धाराशिव शहराच्या विकासासाठी महत्त्वाचे पाऊल : आमदार राणाजगजितसिंह पाटील**



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- धाराशिव शहराच्या पायाभूत सुविधांच्या विकासाला आणखी वेग देणारा महत्त्वपूर्ण निर्णय महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ अर्थात एमएसआयडीसीने घेतला आहे. भातांब्रा-धाराशिव-सारोळा-शिवली-बोरफळ या रस्त्याच्या सुधारणा प्रकल्पास मंजुरी देण्यात आली आहे. या मंजुरीमुळे धाराशिव शहर व परिसरातील अनेक प्रलंबित विकासकामे प्रत्यक्षात त्यामुळे मार्गी लागणार असल्याची माहिती आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

या सुधारित आराखड्यामुळे धाराशिव शहरातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, सुरक्षित आणि भविष्यातील वाढत्या गरजांना पूरक होणार आहे. शहरातील जिजाऊ चौक ते सांजा चौकच्या पुढे सुमारे ९९० मीटरपर्यंत चारपदरी रस्ता विकसित केला जाणार आहे. त्यानंतर आणखी १.६७ कि.मी. अंतरापर्यंत चौपदरीकरण करण्यात येणार आहे. तसेच सांजा गाव परिसरात ६०० मीटर आणि सारोळा गाव परिसरात ७५० मीटर अतिरिक्त चौपदरीकरणाचा समावेश करण्यात आला आहे. शहरातील पावसाळ्यातील पाणी साचण्याच्या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून जिजाऊ चौक ते सांजा चौकदरम्यान ४.२४४ कि.मी. लांबीची आरसीसी बंदिस्त गटारे आणि पदपथ उभारण्यात येणार आहेत. त्यामुळे पायी चालणाऱ्या नागरिकांना सुरक्षित सुविधा उपलब्ध होण्याबरोबरच शहराचा दर्जाही उंचावणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी म्हटले आहे.

याशिवाय एमएसईबी उपकेंद्र ते सांजा चौक या मार्गावर ३६० मीटर स्मार्ट स्ट्रीट विकसित करण्यात येणार आहे. या परिसराचे आधुनिक स्वरूपात सुशोभीकरण केले जाणार आहे. आवश्यक त्या ठिकाणी उपयुक्त सेवा वाहिन्यांचे स्थलांतर, पाइप कल्व्हर्टचे रुंदीकरण आणि इतर पूरक कामांचाही या सुधारित आराखड्यात समावेश आहे. एमएसआयडीसी मंजूर केलेल्या सुधारित आराखड्यानुसार सुमारे ४५.६८ कोटी रुपयांच्या अतिरिक्त विकासकामांचा समावेश यात करण्यात आला आहे. त्याचबरोबर काही पूर्वनियोजित कामांमध्ये बदल करून संपूर्ण प्रकल्प आर्थिकदृष्ट्या संतुलित ठेवण्यात आला आहे. धाराशिव शहराचा सर्वांगीण व नियोजनबद्ध विकास, वाहतूक कोंडीवर उपाय, पावसाळ्यातील पाणी निचरा, सुरक्षित पदपथ आणि आधुनिक नागरी सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही मंजुरी अत्यंत महत्त्वाची असून, या प्रकल्पामुळे धाराशिवच्या विकासाला नवी गती मिळणार असल्याचा विश्वासही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला.

## कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीत उभारणार अत्याधुनिक शेतकरी भवन

**राज्य शासनाकडून १.५२ कोटींच्या प्रकल्पास प्रशासकीय मान्यता; आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्याला यश**

कळंब (प्रतिनिधी)- कृषी उत्पन्न बाजार समितीच्या आवारात राष्ट्रसंत तुकडोजी महाराज शेतकरी भवन योजनेअंतर्गत अत्याधुनिक शेतकरी भवन उभारण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी १ कोटी ५२ लाख ४८ हजार ४१८ रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता दिली असून, यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांना मुक्काम, बैठका तसेच विविध मूलभूत सुविधा एकाच ठिकाणी उपलब्ध होणार असल्याचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी सांगितले आहे.

या प्रकल्पासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी पणन मंत्री जयकुमार रावल यांच्याकडे पत्राद्वारे पाठपुरावा केला होता. शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीचा प्रस्ताव तातडीने मंजूर करावा, अशी त्यांनी मागणी केली होती. त्यानंतर शासनाने प्रस्तावास मंजुरी देत प्रशासकीय मान्यता जाहीर केली. शासन निर्णयानुसार या प्रकल्पासाठी एकूण खर्चापैकी ७६.२४ लाख रुपयांचे म्हणजेच ५० टक्के अनुदान शासनाकडून दोन टप्प्यांत दिले जाणार आहे. उर्वरित निधी बाजार समितीने स्वनिधी अथवा कर्जाच्या माध्यमातून उभारायचा आहे. मंजूर अंदाजपत्रकात इमारत बांधकाम, गुणवत्ता नियंत्रण, जीएसटी, वीज व्यवस्था, मजूर विमा आदी खर्चांचा समावेश करण्यात आला आहे.

शासनाने या कामासाठी काही अटीही घातल्या आहेत. सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तांत्रिक मान्यता घेतल्यानंतरच निविदा प्रक्रिया राबविण्यात येणार असून, प्रशासकीय मान्यतेच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत शेतकरी भवनाचे बांधकाम पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. कामाच्या प्रगतीचा अहवाल नियमितपणे संबंधित अधिकाऱ्यांना सादर करावा लागणार आहे. तसेच भवनाची देखभाल, दुरुस्ती, वीज-पाणी व इतर दैनंदिन खर्चाची जबाबदारी बाजार समितीवरच राहणार आहे. या निर्णयामुळे कळंब बाजार समितीत येणाऱ्या शेतकऱ्यांना सुरक्षित निवास, बैठक व्यवस्था आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध होणार असून, कृषी बाजार व्यवस्थेला अधिक बळकटी मिळणार असल्याचा विश्वास आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी व्यक्त केला आहे.

## आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समिती, धाराशिवची समन्वय समिती जाहीर

धाराशिव, (प्रतिनिधी)- एस.सी. आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात जिल्हास्तरावर व्यापक जनआंदोलन उभारण्यासाठी आज धाराशिव येथे आरक्षण उपवर्गीकरण विरोधी कृती समितीची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. बैठकीत आगामी आंदोलनाचे नियोजन,जनजागृती आणि विविध सामाजिक संघटनांमध्ये समन्वय साधण्यासाठी ३७ सदस्यीय समन्वय समितीची एकमताने घोषणा करण्यात आली.

समन्वय समितीमध्ये राजाभाऊ ओव्हाळ,धनंजय शिंगाडे, नितीन (बाप्पा) शेरखाने,कैलास शिंदे, संजयकुमार बनसोडे, विद्यानंद बनसोडे,ड. साबने,राजाभाऊ राऊत, सतपाल बनसोडे, पृथ्वीराज चिलवंत,ड.गणपती कांबळे, हरिश डावरे, डी. जी. होसलमल,भाई फुलचंद गायकवाड (पाटील),बंडूभाऊ बनसोडे, अरुणभाऊ बनसोडे, शांतीनाथ शेरखाने,आनंद पांडागळे,ड. के. टी. गायकवाड,एस. के. चेले, भालचंद्र कठारे,अनिल हजारे, सुनिल गायकवाड, मनिष सोनकवडे,राजेंद्र निकाळजे, काका भंडारे,महादेव वाघमारे, विकास बनसोडे, धनराज सोनकवडे, सुनील वाघमारे,फकीरा सूरवसे, कुंदन वाघमारे, किशोर वाघमारे, बाबा मस्के, दादा सरवदे,राजश्री कदम आणि विजय बनसोडे यांचा समावेश करण्यात आला.

बैठकीत एस.सी. आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात जिल्हाभर जनजागृती अभियान राबविणे, विविध सामाजिक संघटना, संविधानप्रेमी नागरिक, युवक, महिला आणि विद्यार्थ्यांना एकत्र आणून आंदोलन अधिक व्यापक करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला. संविधानाने अनुसूचित जातींना दिलेल्या घटनात्मक हक्कांच्या संरक्षणासाठी संघटितपणे लढा उभारण्याचा निर्णयही यावेळी घेण्यात आला.

यावेळी दि. २७ जुलै २०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळा,धाराशिव येथून जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत भव्य संविधान बचाव मोर्चा काढण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली. या मोर्चात जिल्ह्यातील सर्व ५९ अनुसूचित जातींतील नागरिक, सामाजिक संघटना, युवक, महिला, विद्यार्थी आणि संविधानप्रेमींनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे,असे आवाहन करण्यात आले.

बैठकीत समितीच्या प्रसिद्धी व जनसंपर्काची जबाबदारी प्रभावीपणे पार पाडण्यासाठी राजाभाऊ राऊत,सोमनाथ गायकवाड, मुन्नाभाई,ओव्हाळ, कुंदन वाघमारे यांची प्रसिद्धीप्रमुख म्हणून एकमताने निवड करण्यात आली.

## शेतकऱ्याच्या खिशाला कात्री: पाऊस गायब... बोगस बियाणे... निकृष्ट खतांचा सुळसुळाट! धाराशिवचा बळीराजा शेवटी जगायचं तरी कसं?

धाराशिव(रामेश्वर डोंगरे)-धाराशिव जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या संकटांची मालिका काही थांबण्याचे नाव घेत नाही. आधी पावसाने दडी मारून पेरण्या रखडल्या, नंतर कसाबसा पाऊस पडताच शेतकऱ्यांनी लाखो रुपयांचे सोयाबीन बियाणे, खते आणि औषधे खरेदी करून पेरणी केली. मात्र आता उगवणच झाली नाही. अनेक ठिकाणी सोयाबीनचे बियाणे निकृष्ट दर्जाचे निघाल्याने शेतकऱ्यांना पुन्हा ट्रॅक्टर फिरवून दुबार पेरणी करावी लागली. यामुळे बळीराजाच्या खिशाला मोठी कात्री लागली आहे. एकीकडे बोगस बियाणे, तर दुसरीकडे खतांच्या गुणवत्तेबाबतही शेतकऱ्यांमध्ये प्रचंड नाराजी आहे. पैसे आमचे... धोका आमचा... आणि जबाबदारी कोणाची? असा संतप्त सवाल आता प्रत्येक शेतकरी विचारत आहे.

काही कंपन्या आणि विक्रेते केवळ नफ्यासाठी शेतकऱ्यांच्या आयुष्याशी खेळत आहेत का? असा प्रश्नही उपस्थित होत आहे. हजारो रुपये खर्च करूनही पीक उगवत नसेल, तर शेतकरी कर्ज फेडणार कसा? घर चालवणार कसे? मुलांचे शिक्षण करणार कसे? हा प्रश्न आज प्रत्येक गावात ऐकू येत आहे.

कृषी विभागाने केवळ पंचनाम्यांची औपचारिकता न करता दोषी बियाणे उत्पादक कंपन्या, विक्रेते आणि निकृष्ट खतांचा पुरवठा करणाऱ्यांवर कठोर कारवाई करावी. शेतकऱ्यांना तात्काळ नुकसानभरपाई देऊन त्यांच्या विश्वासाला न्याय द्यावा, अशी मागणी जोर धरत आहे.

धाराशिवचा बळीराजा आज संकटाच्या विळख्यात आहे. सरकारने केवळ घोषणा न करता शेतकऱ्यांना तातडीने न्याय द्यावा. अन्यथा शेती वाचवणे अवघड होईल असे चित्र सध्याला दिसून येत आहे.

## ४६९ कारवाया करुन ४,६९,३०० 'तडजोड शुल्क'वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०९ जुलै रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ४६९ कारवाया करुन ४,६९,३०० 'तडजोड शुल्क'वसुल केले आहे.

ओ३म् भूर्भुव: स्व: ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो न: प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## भेसळखोरांना माफी नसावी

राज्यातच काय देशात भेसळखोरांची वाढती संख्या चिंता व्यक्त करणारी आहे. देशात तुकाराम मुंडे यांनी भेसळखोरांना उघडे पाडले व मोठ्या प्रमाणात भेसळ होते हे आता कोठे कळाले. महाराष्ट्र तुकाराम मुंडे यांची एफडीए विभागाचा चार्ज घेताच अनेक भेसळखोर कोण व कसे आहेत हे जनतेला काळाले. चांगले व नामांकित असलेल्या खाद्य पदार्थ निर्माण करणाऱ्यावर धाडी टाकून बंदी आणली गेली. अनेक शेकडोच्या घरात अन्न व भेसळ विभागाने धाडी टाकून चुकीचे जे करीत आहेत त्यांची झोप उडवली आहे. मुळात आपल्याच देशातील आपल्याच बंधुभावांना, कुटुंबियांच्या अन्नात विष कालविण्याचे काम होते हे मोठे दुर्दैव आहे. त्यामुळे अशा चुकीच्या व्यक्तीला कठोरातील कठोर शिक्षा झाली पाहिजे. सरकारने या बाबत विचार केला पाहिजे. तसे देशात भेसळखोरांची संख्या कमी नाही. कशासाठी चांगल्या अन्नात माती कालविण्याचे काम होते हे कळून येत नाही. वास्तविक अनेकदा या बाबत शंका येते, मात्र भारतीय मंडळी चांगल्या विचाराची आहे ती भेसळ कशाला करेल असे वाटत होते. दुसरे कडे मोठ्या प्रमाणात पनीर मिळते. पनीर दुधापासून तयार केले. एवढ्या मोठ्या प्रमाणात देशात किंवा राज्यात गायी-म्हशी नसताना पनीर कसे उत्पादित होते ही शंका होती. ही शंका तुकाराम मुंडे यांनी उघडी करून दाखविली आहे. पनीर, खवा, काही बेकरीमध्ये मिळणारे पदार्थ हे भेसळीचे सापडली. त्यामुळे वाईट वाटते. सध्याला पाल्याभाज्या व फळे हे दुषीत करून विक्री करताना सापडली आहे. आपण जे अन्न खातो की विष खातो हेच कळून येत नाही. अनेक अन्नाच्या पदार्थात चुकीचे पदार्थ केमिकल्स मिसळले जातात कारण यापासून अधिक उत्पन्न मिळेल. वास्तविक हे चुकीचे आहे. तसे पाहिले तर कोणता पदार्थ शुद्ध आहे. हेच कळून येत नाही. कधी-कधी वाटते काय खावे. ज्यात शुद्धता असेल. सर्वात दुषीतपना अढळून येतो. अन्नपदार्थात भेसळ रोखले पाहिजे. बाजारात जे पदार्थ विकले जातात ते शुद्ध आहेत कशावरून? या बाबत जनतेला कळून येत नाही. जनतेला आपण खरेदी केलेला पदार्थ भेसळमुक्त आहे हे कळत नाही. मुळात अन्न व भेसळ विभाग एवढा चांगला आहे हे ज्यावेळी भेसळीचे पदार्थ पकडल्यावर कळून आले. यापुर्वी या कडे कोणाचे लक्ष नव्हते. तसे पाहिले तर दुधात पाणी घालणे हा देखिल भेसळीचा प्रकार आहे. आज घरोघरी दुध घेतले जाते ते अशुद्ध समजले जात आहे कारण पाण्याचे प्रमाण कमी आहे. दुसरे असे की, दुध हे केमिकल्सचा वापर करून केले जाते जे आरोग्यास मोठे घातक आहे. लहान मुलासाठीसाठी तर हानीकारक आहे. त्यामुळे राज्य सरकारने दखल घेवून या बाबत कडक नियमावली तयार केली पाहिजे. कडक व पळवाटा नसणारी नियमावली असली पाहिजे. सध्याला अनेक पळवाटा असल्याने शिक्षा होत नाही. त्यामुळे काळ सोकावला जात आहे. हे योग्य नाही. पुर्वी भेसळ नव्हते. शुद्ध दुध मिळत होते. वरचेवर मागणी वाढली. पुरवठा करणे अशक्य होवू लागले असेल, त्यामुळे चतुर व्यक्तींनी युक्ती शोधून भेसळ होवू लागले असेल असे दिसून येते. यावर त्याच वेळी निर्बंध किंवा कडक कायदे-नियमाची अमलबजावणी झाली असती तर याचा फैलाव झाला नसता. तसा विचार केला तर प्रत्येक बाब ही भेसळ दिसून येते. अन्न शुद्ध आहे याचा भरोसा दिसून येत नाही. अन्नातून बऱ्यादा विष बाधा झालेली आहे. याचे कारण भेसळ आहे हे सहज लक्षात येते. वाईट व देश-समाजविरोधी मंडळी यात गुंतलेली आहे. त्यामुळे कडक नियम व शिक्षेची तरतुद असली पाहीजे. वास्तविक नियम व कायद्याची अमलबजावणी महत्वाची आहे. भेसळ केल्यास मोठी शिक्षा होते. अशी भीती निर्माण झाली पाहिजे. सध्याला काय होते दंडच भरावा लागतो ही मानसिकता निर्माण झाली आहे. अनेक ठिकाणी भेसळ दिसून येते. या बाबत जनता सुद्धा आवज उठवित नाही. जनता मुळात संवेदनशील राहीली नाही. सुन्न बनली आहे. अन्याया विरोधात आवज उठवित नाही. दुसरी बाजूही समजून घेतली तर लक्षात येते, अशा घटनेबाबत वरिष्ठाकडे तक्रार केल्यास न्याय मिळेल याचा भरोसादिसून येत नाही. बऱ्याचदा न्याय कोणाकडे मागावा, मागितला तर न्याय मिळेलच याचा भरोसा दिसून येत नाही. त्यामुळे सरकारने पहिल्यांदा कायद्याची अमलबजाणी तंतोतंत करावी. जनतेला विश्वास वाटला पाहिजे की, तक्रार केल्यास चौकशी होवून न्याय मिळातो! आलिकडे प्रशासन एवढे सुस्त झाले की, गप्प बसल्याचे बरे, अशी मानसिकता निर्माण झाली आहे. भेसळखोर हे गडगंज, श्रीमंत व काही प्रमाणात गुंड असतात. त्याचा बंदोबस्त केला जात नाही. गोरगरीब किंवा जनसामान्य भेसळीस तयार नसतो. काहि दुधवाले चांगले दुघ वितरीत करतात, मात्र जे मोठ्या प्रमाणात गुंडगिरी करताता, तेच मोठ्या प्रमाणात भेसळ करतात हे उघड दिसून येते. त्यामुळे भेसळ उघडे पडले तर त्याला कडक शिक्षा झाली पाहिजे. अशी शिक्षा असावी की, पुन्हा भेसळ करण्याची हिंमत होणार नाही. सध्याला भीती राहिली नाही. त्यामुळे प्रत्येक बाबतीत भेसळ होत आहे. पाल्याभाज्य, फळे, दुधजन्य पदार्थ, अन्नधान्य शुद्धतेबाबत शंका निर्माण होत आहे ही बाब विचार करायाला लावणारी आहे. दररोज लागणारे दुधात तरी भेसळ केली जावू नये. परवडत नाही हे कारण पुढे करून अन्नात माती कालविण्याचे काम केले जात आहे. तुकाराम मुंडे सारखे अधिकारी असले पाहिजे. मुंडे सारख्यांचा विचार इतर अधिकाऱ्यात दिसून येत नाह. एफडीएच्या कारवाईने अनेक जन घाबरले आहेत. असा वचक इतर अधिकारी बसवतील का मुख्य प्रश्न आहे. जे वुकीचे होते, ते दिसते-कळते तरी भेसळीचे प्रमाण वाढते आहे. आता या बाबत जनतून विचार पुढे आले पाहिजे. सरकारपेक्षा जनतनेनी विचारपुर्वक चालले पाहिजे. भेसळकरणारी चुकीच्या बाबी सोडून दिल्या पाहिजे. आपणच आपल्या परिवाराला भेसळ रोखणारे प्रशिक्षण घेण्याची गरज आहे. जे चांगले ते मिळावे, वाईटबाबी सोडून दिले पाहिजे. आता सांगून-समजावुन सांगण्यापेक्षा कडक नियम तोडणाऱ्याविरोधात कडक कायदे असावेत, त्याची कडक अमलबजावणी झाली तरच भेसळपना कमी होणार आहे. नसता आपल्याच माणसाला आपण विष खाऊ घालणे मोठे वाईट आहे, पाप आहे.

# कोटी देवांचे पावन धाम :

### सोनार समाजाचे श्रद्धास्थान श्रीं. कोर्टेश्वर महादेव. आधी कोर्टी मग सृष्टी संत नरहरी महाराजांच्या माता पिता आणि बंधूच्या विस्मरणात गेलेल्या पावन समाधी स्थळाचा महिमा !



देवा तुझा मी सोनार, तुझा नामाचा व्यवहार असे म्हणत विठ्ठल चरणी आणि शिवचरणी लिन झालेले वारकरी संप्रदायातील महान संत शिरोमणी नरहरी महाराज हे आपल्या अखिल सोनार, सुवर्णकार समाजाचे दैवत आणि अस्मिता आहेत. पंढरपूर येथील महाद्वाराजवळ असलेल्या त्यांच्या मुख्य समाधी मंदिराला आणि प्रतीक समाधीला दरवर्षी लाखो भाविक भेट देतात. तथापी अत्यंत खेदाची आणि आत्मपरीक्षण करण्याची गोष्ट म्हणजे ज्या माता पित्यांच्या पोटी या अलौकिक संताने जन्म घेतला आणि ज्या धाकट्या बंधुने त्यांच्या खांद्याला खांदा लावून भक्तीचा प्रसार, प्रचार केला त्यांचे मूळ समाधी स्थान बहुतांश समाज बांधवापासून अनभिज्ञ आहे. पंढरपूर पासून अवघ्या सात किलोमीटर वर पंढरपूर -- कराड रस्त्यावर कोर्टी या ऐतिहासिक गावात हे समाधी स्थळ आहे.

तेथील पुजारी श्री. अमोल गुरव व त्यांचे बंधू श्याम गुरव यांनी सांगितले की, या स्थळाची माहिती ज्यांना आहे असे मोजकेच सोनार समाज बांधव येथे येतात. वर्षभरात त्यांची संख्या जेमतेम शंभरच्या आसपास असते. आपल्या दैवतांच्या माता पित्याचे, बंधूचे स्थान असे दुर्लक्षित राहणे हे आपल्या समाजासाठी चिंताजनक आहे. संपूर्ण सोनार समाजाने जागृत होऊन या पवित्र समाधी स्थळाचे प्रचार, प्रसार करणे आणि येथे दर्शनासाठी येणे ही काळाची गरज आहे. पंढरपूर परिसरात एक अतिशय जुनी आणि महत्वाची म्हण, आधी कोर्टी मग सृष्टी. प्रसिद्ध आहे. या विधानामागे या भूमिचे अनादी काळापासूनचे अध्यात्मिक महत्व दडलेले आहे. या क्षेत्रात प्राचीन काळी एक कोटी देवी देवतानी एकत्र येऊन वास्तव्य केले होते. म्हणून कोटी या शब्दाचा अपभ्रन्श होऊन या गावचे नांव कोर्टी असे रूढ झाले असावे असे मानले जाते. शैव संप्रदायामध्ये या स्थानाला सर्वोच्च मानले जाते.

सृष्टीच्या निर्मिती पूर्वी किंवा विठ्ठल स्वरूप प्रकट होण्यापूर्वी भगवान शंकराची ही मुख्य तपोभूमी होती. अशी श्रद्धा आहे. येथील श्री. कोर्टेश्वर महादेव मंदिर हे संपूर्ण सोलापूर जिल्ह्यातील एकमेव सात गर्भगृहे ( सप्तलिंग ) असलेले अद्वितीय प्राचीन मंदिर आहे असे सांगून पुजारी श्री. अमोल गुरव पुढे म्हणाले की, याच पवित्र आणि जागृत क्षेत्रात संत नरहरी महाराजांच्या पूर्वजानी आपली भक्ती रुजविली. संत नरहरी महाराजांचे पूर्वज मूळचे देवगिरी. यादव राजांच्या काळात राजकीय आणि सामाजिक बदलानंतर हे घराणे सांगली जिल्ह्यातील मिरज जवळच्या म्हेत्रे गावी आले. पिढ्यानपिढ्या हे सोनार घराणे जन्मापासून कट्टर शिवभक्त होते.

नरहरी महाराजांचे आजोबा मुरारी आणि वडील अच्युतबाबा हे आपल्या सोनार व्यवसायानिमित्त आणि पंढरीच्या अध्यात्मिक आकर्षणापोटी पंढरपूरात आले. ते विठ्ठल मंदिराच्या महाद्वाराजवळ सराफी व्यवसाय करत असत. मात्र त्यांची भक्ती भगवान शंकरावर अढळ होती. पंढरपूर हे मुख्यत्वे विठ्ठल - वैष्णव क्षेत्र असल्याने अच्युतबाबा व त्यांच्या पत्नी सावित्रीबाई यांनी आपल्या दैनंदिन शिव उपासनेसाठी पंढरपूर जवळच असलेल्या कोर्टी येथील शांत आणि पवित्र कोर्टेश्वर महादेव मंदिर परिसराची निवड केली. ते रोज या तपोभूमीत येऊन महादेवाची आराधना करत असत.

अच्यूतराव व सावित्रीबाई यांना लग्नानंतर बरीच वर्षे अपत्य नव्हते. त्यांनी कोर्टीच्या कोर्टेश्वर महादेवाला साकडे घातले. महादेवाच्या आशीर्वादाने त्यांच्या पोटी दोन रत्न जन्माला आले. थोरले संत नरहरी महाराज व धाकटे संत नारायण स्वामी. संतांच्या जीवन चरित्रातील कथेनुसार एकदा शिवरात्रीच्या परम पावन दिवशी हे दाम्पत्य कोर्टी येथील मंदिरात शिव नामाचा अखंड गजर करत भक्तीत पूर्णपणे लिन झाले होते. त्या दिव्य क्षणी त्यांना ईश्वरी संकेत मिळाले आणि दोघांनीही एकाच वेळी, एकाच ठिकाणी आपला देह त्याग केला. एकाच क्षणाला पती पत्नीचा आत्मा शिव चरणी विलीन होणे ही एक अलौकिक घटना होती. या अलौकिक घटनेची साक्ष म्हणून कोर्टी येथे त्यांची एकत्रित समाधी बांधण्यात आली.



बंधू संत नारायण स्वामी म्हणजे अद्वैत भक्तीचा वसाच !. संत नरहरी महाराजांचे धाकटे बंधू संत नारायण स्वामी ( नारायण महाराज ) हे देखील उपजतच अत्यंत सात्विक वृतीचे होते. त्यांनी थोरल्या भावाला केवळ भाऊ न मानता आपले गुरु व मार्गदर्शक मानले. नरहरी महाराजांच्या सुवर्ण व्यवसायात आणि त्यांच्या भक्तीच्या प्रवासात नारायण स्वामींची साथ मोलाची होती. सुरुवातीला केवळ शिवभक्ती करणाऱ्या या कुटुंबात जेव्हा संत नरहरी महाराजांना विठ्ठलाच्या मूर्तिमध्ये शिवाची पिंड दिसली आणि हरि - हर ( विठ्ठल आणि शिव ) एकच असल्याचा सक्षात्कार झाला. तेंव्हा नारायण स्वामींनीही या अद्वैत विचारांचा पूर्ण स्विकार केला. आई वडिलांच्या पश्चात त्यांनी आपले संपूर्ण जीवन याच भक्तीत व्यतीत केले आणि शेवटी कोर्टी येथेच आई वडिलांच्या समाधीच्या अगदी शेजारी त्यांनीही समाधी घेतली.

कोर्टी येथील हे समाधी स्थळ हे एक दर्शन स्थान नसून ती एक जागृत अध्यात्मिक भूमी आहे. येथे आल्यावर भाविक पुढील स्थळांना भेट देतात असे तेथील जेष्ठ नागरिक श्रीं. धुळा रामा वाघामोडे आणि श्री नागेशराव कुलकर्णी यांनी सांगितले की, कोर्टी हे क्षेत्र प्राचीन काळापासून अनेक ऋषींमुनींचे तपोवन होते. येथे अनेक ऋषींनी भगवान शंकराला प्रसन्न करण्यासाठी हजारो वर्षे कठोर तपश्चर्या केली. शैव संप्रदायात शिव पूजेसाठी भस्माला अनन्यसाधारण महत्व आहे. ऋषींमुनींनी केलेल्या होमहवनाची आणि धुनीची राख वर्षानुवर्षे एकाच ठिकाणी जमा होत गेली.या जागेला अलौकिक शक्ती प्राप्त झाली. येथील भस्म घरी नेऊन कपाळाला लावल्याने घरातील नकारात्मक ऊर्जा दूर होते. आजारपण बरे होते. मनाला शांतता लाभते असे मानले जाते. पवित्र भस्माचा डोंगर -- विभूती टेकडी ---- मुख्य मंदिरापासून साधारणतः दोनसे पन्नास फुटावर व समाधी स्थळापासून अवघ्या पन्नास फुटावर निसर्गतः तयार झालेला भस्माचा डोंगर आहे.संत नरहरी महाराजांचे आई वडील, बंधू याच पवित्र भस्माचा कपाळाला टिळा लावून महादेवाची आराधना करायचे.या डोंगराची माती भस्म अत्यंत पवित्र मानली जाते. भक्त हे भस्म कपाळाला लावतात आणि समाधीचे दर्शन घेतात.

आजही येथे येणाऱ्या भाविकांना वेगळीच शांतता आणि ऊर्जा जाणवते. पूर्वी सोनार समाज बांधव याठिकाणी येऊन समाधीस रुद्राभिषेक करायचे तसेच आपल्या सुवर्ण व्यवसायातील मुख्य अवजारे ऐरण, लहान मोठे हातोडे, मुस, कातरी, कानस,चिमटा,पोतडी आदी समाधीच्या चरणी ठेऊनसुवर्ण व्यवसायाला बरकत येण्यासाठी आशीर्वाद मागायचे. सोनार समाजासाठी या क्षेत्राचे महत्व अतिशय अनमोल आहे. सोनार समाजासाठी संत नरहरी महाराज हे केवळ एक संत नसून कुळदैवत आहेत. मग ज्या मातीने आपल्या कुळदैवतास जन्म दिला ती कोर्टीची भूमी आपले मूळ कुळतीर्थ का ठरू नये ?.

वर्षभरात अत्यल्प भाविक येतात हे चित्र बदलण्याची वेळ आली आहे. आज श्री. अमोल पुजारी यांनी व्यक्त केलेली खंत डोळ्यात अंजन घालणारी आहे. कोट्यावधीच्या संख्येत असलेला आपला सोनार समाज वर्षाला शंभर च्या संख्येने येथे येतो याचे मुख्य कारण म्हणजे माहितीचा अभाव !. हा लेख वाचणाऱ्या प्रत्येक समाज बांधवांचे हे कर्तव्य आहे की त्यांनी ही माहिती आपल्या कुटुंबापर्यंत आणि नातेवाईकांपर्यंत पोहोचवावी. कोर्टी येथील या पवित्र समाधी स्थळाचा महाराष्ट्र, पर्यायाने देशभर प्रचार, प्रसार होण्यासाठी सोनार समाजातील प्रत्येक घटकाने पुढे येणे गरजेचे आहे. कोर्टी वारीची परंपरा चालू करणे. दरवर्षी आषाढी, कार्तिकी, एकादशी किंवा माघ वद्य तृतीया ( संत नरहरी महाराज पुण्यतिथी ) या काळात पंढरपूर ला येणाऱ्या प्रत्येक सोनार बांधवाने, पहिले दर्शन कोर्टीचे, मग दर्शन पंढरीचे. हे नियम स्वतःला लावून घेतला पाहिजे. या लेखातील माहिती आपल्या समाजाच्या व्हाट्सअप ग्रुपवर, फेसबुक वर, यू ट्यूब वर मोठया प्रमाणावर शेअर करावेत. प्रत्येक शहर, गावातील समाज संघटनानी, मंडळानी आपल्या वार्षिक सहली किंवा धार्मिक यात्रा आयोजित करताना पंढरपूर सोबत कोर्टी येथील समाधी दर्शनाचा समावेश आवर्जून करावा.मोठया संख्येने आपण हजेरी लावू या. चला कोर्टीला, वंदन करू या, संत नरहरी महाराजांच्या माता, पिता, बंधूच्या चरणी. जय हरि विठ्ठल, जय कोर्टेश्वर महादेव !. शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, आपल्या पूर्वजांचा आणि सोनार, सुवर्णकार समाजाचा हा दैवी वारसा फक्त इतिहासाच्या पानावर मर्यादित राहू नये. पंढरपूर च्या पवित्र भूमी पासून अवघ्या सात किलोमीटर अंतरावर असलेले, श्री. क्षेत्र कोर्टी हे केवळ एक मंदिर नसून आपल्या अस्मितेचे केंद्र आहे. जेंव्हा जेंव्हा आपण पंढरीची वारी करू तेंव्हा, या सात गर्भगृह असलेल्या अद्वितीय कोर्टेश्वर महादेवाच्या चरणी नतमस्तक होण्यासाठी वेळ नक्की काढा. चला, आपल्या या वैभवशाली तीर्थक्षेत्राचा प्रचार करू या.आणि येणाऱ्या पिढीला या समृद्ध वारशाची ओळख करून देऊ या.हर हर महादेव !

( संदर्भ व कृतज्ञता ----- श्री. कोर्टेश्वर महादेव मंदिर देवस्थान व समाधी स्थळ, कोर्टी ( पंढरपूर ), स्थानिक जेष्ठ नागरिक व पुजारी परिवार कोर्टी, पंढरपूर )



वसंत रा. पोतदार, अध्यक्ष,
सोनार समाज संस्था, सोलापूर.
मोबाईल : ९४२३० ६५९१५

# मातीतील अदृश्य प्राणी विश्व अस्तित्वाच्या संकटात



आपण पर्यावरण संवर्धनाचा विचार करताना जंगल, नद्या, वाघ, चिमण्या किंवा प्लास्टिक प्रदूषणाबद्दल बोलतो; पण आपल्या पायाखालील मातीमध्ये अब्जावधी जीवांचे एक समृद्ध विश्व वसलेले आहे, याची फार कमी जणांना जाणीव असते. प्रत्यक्षात माती ही केवळ शेतीसाठी वापरली जाणारी जमीन नसून ती पृथ्वीवरील सर्वाधिक जैवविविधतेचा अधिवास आहे. संयुक्त राष्ट्रांच्या अन्न व कृषी संघटनेच्या माहितीनुसार, पृथ्वीवरील सुमारे २५ टक्क्यांहून अधिक जैवविविधता मातीमध्ये आढळते, आणि स्थलीय परिसंस्थेतील सुमारे ४० टक्के सजीव आपल्या जीवनचक्रातील कोणत्या ना कोणत्या टप्प्यावर मातीशी निगडित असतात. जीवाणू, बुरशी, आदिजीव, सूत्रकृमी, गांडुळे, सहस्रपादी, शतपदी, कुंतकीटक, कणकीटक आणि इतर असंख्य अपृष्ठवंशी जीव मिळून मातीला जिवंत ठेवतात. दुर्दैवाने हे अदृश्य प्राणीविश्व आज अस्तित्वाच्या संकटात सापडले आहे.

मातीतील या जीवांना जीवशास्त्रात मृदा प्राणिजात असे म्हटले जाते. हे जीव मृत पाने, कुजलेले लाकूड, पिकांचे अवशेष आणि इतर सेंद्रिय पदार्थांचे विघटन करून पोषकतत्त्वांचे पुनर्चक्रण करतात, हवा खेळती ठेवतात आणि मातीची रचना सुधारतात म्हणूनच आधुनिक पर्यावरणशास्त्रामध्ये त्यांना परिसंस्थेचे अदृश्य अभियंते असे संबोधले जाते. हे जीव नसतील, तर सुपीक मातीची कल्पनाच करता येणार नाही. विशेष म्हणजे, जगातील बहुतांश वनस्पती अंतर्मूळ बुरशींसोबत सहजीवी संबंध निर्माण करतात, या भूमिगत बुरशी-जाळ्याला शास्त्रज्ञ भूमिगत वृक्षजाल असे संबोधतात, ज्याद्वारे वनस्पतींमध्ये पाणी, खनिजे आणि रासायनिक संदेशांची देवाणघेवाण होते.

हे सर्व सजीव एकमेकांशी जोडलेले असून, त्यांच्यावर अवलंबून असलेले उभयचर, सरपटणारे प्राणी, पक्षी व लहान सस्तन प्राणी मिळून एक भूमिगत अन्नजाळे तयार होते. या जाळ्यातील एखादा दुवा तुटला, तर त्याचे परिणाम संपूर्ण परिसंस्थेवर होतात, यालाच पर्यावरणशास्त्रात पर्यावरणीय साखळी-परिणाम असे म्हणतात. त्यामुळे मृदजीवांची घट ही केवळ एका जीवाची हानी नसून संपूर्ण पर्यावरणीय संतुलनासाठी धोक्याची घंटा आहे.

अलीकडेच ब्रिटिश ट्रस्ट फॉर ऑर्निथॉलॉजी या संस्थेच्या शास्त्रज्ञांनी जवळपास शंभर वर्षांतील १०० हून अधिक अभ्यासांचे विश्लेषण करून एक महत्त्वाचा निष्कर्ष मांडला ज्यामध्ये गांडुळांची संख्या दरवर्षी सुमारे १.६ ते २.१ टक्क्यांनी घटत असून, गेल्या २५ वर्षांत ही घट ३३ ते ४१ टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे.

आज हे प्राणीविश्व अनेक मानवनिर्मित आणि हवामानजन्य संकटांना सामोरे जात आहे. रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिवापर, जंगलतोड, वाढते शहरीकरण, मातीचे काँक्रीटीकरण, खोल नांगरणी, पिकांचे अवशेष जाळणे, तसेच वाढते तापमान, अनियमित पर्जन्यमान आणि दीर्घकाळ पडणारा दुष्काळ यांमुळे मृदजीवांचे नैसर्गिक अधिवास झपाट्याने नष्ट होत आहेत आणि त्यांचे वर्तन, प्रजनन व वितरण विस्कळीत होत आहे. कीटकनाशके केवळ हानिकारक कीटकांनाच नव्हे, तर मातीतील उपयुक्त अपृष्ठवंशी जीवांनाही मोठ्या प्रमाणावर हानी पोहोचवत असल्याचे अनेक संशोधनांत स्पष्ट झाले आहे. यालाच कीटक-प्रलय असे म्हणतात. परिणामी मातीतील जैविक अन्नसाखळी कमकुवत होत असून, विघटन करणाऱ्या जीवांची क्रियाशीलता कमी झाल्याने पोषकतत्त्वांचे पुनर्चक्रणही मंदावते.

भारत सरकारच्या मृदा आरोग्यपत्रिका योजनेमुळे देशभरातील मातीच्या पोषकतत्त्वांचे परीक्षण करण्याचे मोठे काम सुरू झाले आहे. राष्ट्रीय पर्जन्याश्रित क्षेत्र प्राधिकरणाच्या मते, भारतीय मातीतील सेंद्रिय कर्बाचे प्रमाण गेल्या ७० वर्षांत सुमारे १ टक्क्यावरून घसरून ०.३ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे. महाराष्ट्राची स्थिती याहूनही अधिक चिंताजनक आहे ज्यामध्ये ६० टक्क्यांहून अधिक मातीच्या नमुन्यांमध्ये सेंद्रिय कर्बाचे प्रमाण ०.४० टक्क्यांपेक्षा कमी आढळले असून, ते शास्त्रीयदृष्ट्या 'कमी' या वर्गवारीत मोडते. सेंद्रिय कर्ब हाच मृदजीवांचा मुख्य अन्नस्रोत असल्याने, ही घट थेट मातीतील जीवसृष्टीच्या ऱ्हासाशी जोडलेली आहे. त्यामुळे मातीचे आरोग्य केवळ नत्र, स्फुरद किंवा पालाश यांच्या आधारे नव्हे, तर मृदजीवांची विविधता आणि सूक्ष्मजीवांची क्रियाशीलता यांच्या आधारेही तपासले गेले पाहिजे. भविष्यात मृदा जैवविविधता सनियंत्रणाला प्राधान्य देण्याची गरज आहे.

या समस्येवर उपायही आपल्या हातात आहेत. रासायनिक कीटकनाशकांचा विवेकपूर्ण वापर, सेंद्रिय खतांचा आणि कंपोस्टचा अधिक वापर, पिकांचे अवशेष न जाळणे, मातीचे अनावश्यक काँक्रीटीकरण टाळणे, नैसर्गिक अधिवासांचे संरक्षण करणे आणि मृदजीवांविषयी शालेय स्तरापासून जनजागृती निर्माण करणे ही काळाची गरज आहे. माती ही केवळ शेतीचे साधन नसून एक जिवंत परिसंस्था आहे, ही जाणीव समाजात रुजली पाहिजे.

आज आपण डोळ्यांना दिसणाऱ्या प्राण्यांच्या संरक्षणासाठी प्रयत्न करतो; पण पृथ्वीवरील जीवनाचा पाया असलेल्या या अदृश्य प्राणीविश्वाकडे दुर्लक्ष करतो. मातीतील हे सूक्ष्म आणि अपृष्ठवंशी जीव शांतपणे आपले कार्य करत असतात; परंतु त्यांच्या अस्तित्वावरच अन्नसाखळी, जैवविविधता आणि पर्यावरणीय संतुलन उभे आहे. माती जिवंत राहिली, तरच पर्यावरण जिवंत राहील; आणि पर्यावरण जिवंत राहिले, तरच मानवाचे भविष्य सुरक्षित राहील.



प्रा. यशवंत पटणे
प्राणीशास्त्र विभाग,
महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर
७४९९१०६९२४

# राष्ट्रनिष्ठ जहाल क्रांतिकारक रामकृष्ण खत्री यांची जीवनगाथा

गाऊ त्यांना आरती : शिरीष चिटणीस

रामकृष्ण खत्री या जहाल स्वातंत्र्यसेनानीस ९ ऑगस्ट १९२५ रोजी काकोरी रेल्वे दरवड्यातील सहभागाबद्दल १० वर्षांची कठोर कारावासाची शिक्षा भोगावी लागली. हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशन या जहाल संघटनेचे ते प्रमुख आधारस्तंभ होते. या संघटनेतर्फे पहिला दरोडा ९ मार्च १९२३ रोजी बिचपुरी या ठिकाणी घालण्यात आला. त्यात रामकृष्ण खत्री, पंडित रामप्रसाद बिस्मिल, अशफकउल्ला, शचींद्र बक्षी व मन्मथनाथ गुप्त सहभागी होते. या साहसपूर्ण दरोड्यात मिळालेली सर्व रक्कम हिंदुस्थान रिपब्लिकन असोसिएशनच्या कार्यासाठी देण्यात आली. यानंतरही दोन दरोडे बमशैली व द्वारकापुर येथे घालण्यात आले. या दोन दरोड्यात रामकृष्ण खत्री यांचा सहभाग नसला, तरी या दरवड्याच्या नियोजनात त्यांचा अंतर्भाव होता. ९ ऑगस्ट १९२५ रोजी पं. रामप्रसाद बिस्मिल यांच्या योजनेप्रमाणे सरकारी पोस्ट ऑफिसचा रेल्वेतून नेण्यात येणारा खजिना काकोरी रेल्वे स्टेशनजवळ लुटण्यात आला.

ही ब्रिटिश राजसत्तेविरुद्धची अत्यंत गाजलेली क्रांतिकारी कारवाई होती. या कारवाईचा उद्देश सरकारी खजिना लुटण्यापेक्षा अधिक व्यापक होता. क्रांतिकारी चळवळीसाठी निधी उभा करणे, ब्रिटिश सत्तेला धोका देणे आणि लोकांमध्ये प्रतिकाराची भावना जागृत करणे हा होता. रामकृष्ण खत्री या चळवळीच्या नेटवर्कमध्ये असल्यामुळे त्यांना या प्रकरणाशी जोडले गेले. महाराष्ट्रातील बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, या गावी ३ मार्च १९०२ रोजी जन्मलेल्या रामकृष्ण खत्री यांचे आयुष्य हे बालपणापासून मृत्यूपर्यंत राष्ट्रनिष्ठा, त्याग, धैर्य, शिस्त आणि स्मृतीसंवर्धन यांच्या धाग्यांनी विणले गेलेले होते. लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या विचारांचा त्यांच्यावर झालेला प्रभाव हा त्यांच्या राजकीय व्यक्तिमत्त्वाचा मूलाधार होता. लोकमान्य टिळकांनी

ज्या स्वराज्याची ज्वाला जनमानसात चेतवली, त्या ज्वालेची पहिली ठिणगी रामकृष्ण खत्री यांच्या तरुण मनात पडली आणि पुढे ती ठिणगी संघटन, प्रचार, साहस आणि क्रांतिकारी कृतीत रूपांतरित झाली. रामकृष्ण खत्री यांचे जीवन भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील शस्त्रधारी क्रांतीबरोबरच वैचारिक जागृती करणारे, संघटन उभारणारे, स्मृती जपणारे आणि स्वातंत्र्यानंतरही राष्ट्रकार्याची मशाल सतत जागती ठेवणारे असे होते.

लोकमान्यांकडून प्रेरणा

रामकृष्ण खत्री यांच्या वडिलांचे नाव शिवलाल चोप्रा आणि आईचे नाव कृष्णाबाई होते. विद्यार्थी जीवनात लोकमान्य टिळक यांच्या व्याख्यानाने प्रेरीत होऊन त्यांनी एक संत मंडळ स्थापन करण्याचा निर्णय घेतला आणि 'न्यूट्रल सोसायटी' या नावाने एक संस्था स्थापन केली. या संस्थेत ते महंत गोविंद प्रकाश या नावाने ओळखले जात होते.

रामकृष्ण खत्री यांची ही संस्था तरुणांना शिस्त, विचार आणि राष्ट्रकार्याकडे वळवण्याचे काम करीत असे. ही संस्था क्रांतिकारी कार्यासाठी पोषक वातावरण निर्मितीसाठी सभा घेणे, तरुणांची

निवड करणे, पत्रव्यवहार, प्रवचने आणि वैचारिक चर्चा याद्वारे स्वातंत्र्यलढ्यासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ तयार करीत असे. लोकमान्य टिळकांच्या भाषणांनी ब्रिटिश साम्राज्याचे जोखड आपल्यावर असून शिक्षण, व्यापार, प्रशासन, न्यायव्यवस्था, पोलिसी दडपशाही, करसंकलन, रेल्वे, दळणवळण आणि सार्वजनिक जीवनाच्या प्रत्येक स्तरावर ब्रिटिश शासनाचा असलेला प्रभाव रामकृष्ण खत्री यांच्या मनावर ठसला. या भाषणांनी देशभक्तीची जाणीव कृतीत उतरवणारे रामकृष्ण खत्री हे स्वातंत्र्याची स्वप्ने पाहणारे थोर राष्ट्रभक्त होते. 'स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे' हे टिळकांचे वाक्य त्यांना स्वातंत्र्यलढ्यासाठी जहाल क्रांतिकारक




बनण्यासाठी प्रेरक ठरले. जहाल क्रांतिकारकांमध्ये सामील होऊन रामकृष्ण खत्री हे हिंदुस्थान असोसिएशन संघटनेमध्ये सामील झाले. क्रांतिकारक चळवळीमध्ये मुरलेलेच लोक संस्थेत असल्यामुळे बाँब तयार करणे व नवीन शस्त्रास्त्रे मिळविणे यात ते कुशल व तरबेज होते. रामकृष्ण खत्री यांचे हिंदी, मराठी, गुरुमुखी आणि इंग्रजी भाषेवर प्रभुत्व होते. महाराष्ट्रातील असल्यामुळे रामकृष्ण खत्री यांचे मराठी भाषेवरील जादा प्रभुत्व बघून पं. रामप्रसाद बिस्मिल यांनी त्यांच्यावर मध्य प्रांत आणि महाराष्ट्र याठिकाणची संघटना

वाढविण्याची जबाबदारी दिली होती. हे कार्य अत्यंत महत्त्वाचे होते, कारण क्रांतिकारी चळवळ सर्व प्रांतात विस्तारणे महत्त्वाचे होते. स्वातंत्र्यलढ्यामध्ये भाषेचे महत्त्व असल्यामुळे रामकृष्ण खत्री यांच्यातील संघटनात्मक कौशल्याने महाराष्ट्र, मध्य प्रांत, उत्तर प्रदेश आणि पंजाबपर्यंत पसरलेल्या क्रांतिकारी जाळ्यांमध्ये संदेश पोहचविणे, कार्यकर्त्यांची भेट घडवणे ही जबाबदारी त्यांनी पार पाडली. एखाद्या व्यक्तीवर विश्वास ठेवला जातो तो त्याच्या वैचारिक निष्ठेमुळे. ती निष्ठा खत्री यांनी टिळकांच्या विचारातून आणि स्वतःच्या राष्ट्रीय उत्कटतेतून सिद्ध केली होती.

आरोपींची धरपकड

काकोरी दरोड्यानंतर ब्रिटिश सरकारने खूप मोठ्या प्रमाणावर धरपकड केली. प्रत्यक्ष हल्ल्यात सहभागी असलेल्यांबरोबरच मदत करणारे, संपर्क पुरवणारे आणि संघटनेशी संबंध असलेल्यांना ताब्यात घेण्यात आले. रामकृष्ण खत्री यांना पुण्यात ताब्यात घेण्यात आले व लखनौ येथे तुरुंगात ठेवण्यात आले. लखनौ तुरुंगात काकोरी खटल्यातील सर्वच आरोपींना ठेवण्यात आले. प्रथम तुरुंगात स्वातंत्र्यलढ्यातील आरोपींना अतिशय वाईट अन्न देण्यात येत असल्यामुळे सर्वांनी झगडा सुरू केला. याचा परिणाम होत नाही असे पाहून रामकृष्ण खत्री व इतरांनी उपवासास प्रारंभ केला. सोळा दिवसांच्या ब्रिटिश सरकारने प्रत्येक आरोपीला प्रतिदिनी दहा आणे भत्ता मान्य केला. लखनौच्या तुरुंगात सर्वच काकोरी दरोड्यातील आरोपी एकत्र राहून मृत्यूची टांगती तलवार डोक्यावर असतानाही देशवीर म्हणून अत्यंत आनंदी होते. काही अध्ययनशील लोकांनी वेगवेगळ्या भाषांचा अभ्यास सुरू केला. काहींनी तुरुंगात आखाडा चालविण्याची अनुज्ञा घेऊन नियमित व्यायामाच्या प्रात्यक्षिकात दंग होऊन राहिले. काही गानविद्येच्या उपासकांनी सतार व पेटी ही वाद्ये ठेवण्याची **(क्रमशः पुढच्या अंकात)**

परवानगी मागून घेतली. मृत्यूच्या छायेत संगीतातील

# संकट काळात मायदेशाची आठवण?

अभिजित अकोळकर



जगायला अमेरिका हवी आणि मरायला भारत हवा, अशी प्रवृत्ती अमेरिकेत राहणार्या आणि अन्य देशांतील भारतीयांमध्ये वाढू लागली आहे. एका आजीबाईंनी नुकतेच भारतीय नागरिकत्व घेतले. त्यामुळे ही बाब अधिकचं उघड झाली. मात्र, संकटकाळात परदेशातील आजार घेऊन भारतात येऊ नका. आजार आणि संकटाचा सामना तेथे धीरोदात्तपणे करावा. आंध्र प्रदेशातील कोंड्रागुंटा महालक्ष्मम्मा (वय ९४) यांनी अमेरिकेचे नागरिकत्व स्वेच्छेने सोडून भारताचे नागरिकत्व नुकतेच घेतले. त्यांना भारतातच उर्वरीत आयुष्य घालवायचे असून भारतात मृत्यू व्हावा म्हणून त्यांनी हा निर्णय घेतला होता.

आलिशान जीवन, केवळ स्वतःची उन्नती करणे या स्वार्थापोटी बरेच जण देश सोडून परदेशात स्थायिक होतात. विद्यार्थी आणि तरुणांचे ठीक आहे; पण वयोवृद्ध पालकांचे काय? एक तर ते मुले आणि नातवंडे भारतात परत येतील अशा भाबड्या आशेने वाट पाहत राहतात किंवा नातवंडांचे संगोपन करणे किंवा घरकामावर देखरेख यासाठी ते जातात.अशा पालकांची स्वार्थी पिढी ना त्यांच्या देशाची असते आणि ना त्यांच्या पालकांची. संकट आली, की पहिली धाव ते त्यांच्या त्यांच्या देशात घेतात. स्वाईन फ्लू, कोरोना आल्यावर ते भारतात आले. इबोला आला की, एक महिला मायदेशात आली.

युद्ध काळातही असेच घडते. देश लोकसंख्येत आता क्रमांक एक बनला आहे. परदेशगमन जरूर करावे आणि तेथे कायमस्वरूपी राहावे. आलिशान जीवन जगण्याची हौस किंवा गरज म्हणून गेलेल्यांनी संकटाचाही सामना तेथेच धाडसाने करावा. तेथील आजार घेऊन भारतात येता कामा नये. घातक संसर्गजन्य रुग्णांना देशात येऊ देणे म्हणजे संसर्ग वाढवण्यास आमंत्रण देणे आहे, याचे भान सरकारने ठेवावे. मानवतेच्या दृष्टीने सरकार संकटकाळात विमाने पाठवते, ही प्रथा आता बंद करावी. किमान महामारीच्या काळात तरी असले उद्योग करून भारतीय नागरिकांना संकटात ढकलू नये. आजाराचे गंभीर परिणाम देशाला भोगायला लावू नये. स्वाइन फ्लूचा फैलाव झाला तेव्हा परदेशातून आलेल्या पर्यटक रुग्णामुळे पुण्यात संसर्ग वाढला. अमेरिकेसह प्रगत राष्ट्रात औषधोपचार पद्धती आधुनिक असल्याचे सांगितले जाते. कोरोनासारख्या आजारावेळी मग काय झाले होते. असा प्रश्न पडतोच ना?

## आईच्या संरक्षणासाठी जीव दिला

मनुष्याच्या विकासात आई-वडिलांची महत्वाची भूमिका असते. ते मुलांना वाढवतात व त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहण्यास सक्षम बनवतात. तसेच मरेपर्यंत आपल्या मुलांच्या कल्याणाचीच प्रार्थना करतात. जगातील सर्व देवता, पैगंबर, साधु-संत व महापुरुषांनी आई-वडिलांच्या सेवेस पुण्य कर्म संबोधले आहे. भगवान बुद्धांनी देखील या सत्याचा अनुभव केला होता म्हणून त्यांनी जीवनात आई-वडिलांना महत्वपूर्ण स्थान दिले. आपल्या उपदेशात ते नेहमी आई-वडिलांची सेवा करण्यास सांगत होते. बौद्ध धर्माचा ग्रंथ सुत्तानिपातच्या पराभव सुत्तात भगवान बुद्धांनी देवास उपदेश देत सांगितले आहे की, जो व्यक्ती आपल्या आई-वडिलांचा सांभाळ किंवा पालन-पोषण करत नाही, त्याचा नाश निश्चित असतो. या ग्रंथाच्या महामंगल सुत्तात बुद्ध म्हणतात की, आई-वडिलांची सेवा करणे सर्वोच्च मंगल कार्य आहे. धम्मिक सुत्तात गृहस्थ धर्माची व्याख्या करत ते सांगतात की, जो धर्मानुसार आई-वडिलांची सेवा करतो, तो स्वयंप्रभ नावाच्या देवलोकात उत्पन्न होतो.बौद्ध धर्माचा प्रसिद्ध ग्रंथ धम्मपदात बुद्ध सांगतात, जगात आई-वडिलांची सेवा सुखकर असते. बुद्धांनुसार आई-वडिलांचे स्थान सर्वोच्च असते. आई-वडिल आपल्या मुलांचे पालनपोषण करुन मोठे करतात, त्यांना जीवनात अग्रेसर राहण्यासाठी समर्थ बनवतात व जीवनभर त्यांना आशिर्वाद देतात. आई-वडिल वृद्ध व असहाय झाल्यावर त्यांची सेवा करणे **(क्रमशः उद्याच्या अंकात)**

## उपदेशकथा:वर्डस्वर्थची कविता

स्वामी विवेकानंदाचे नाव लहानपणी होते नरेंद्र. नरेंद्र ज्या महाविद्यालयात जात होता त्या ङ्गजनरल असेंब्ली कॉलेजफ्चे प्राचार्य होते विल्यम हेस्टी. नरेंद्राविषयी त्यांना अभिमान होता. एकदा ते वर्गात विल्यम वर्डस्वर्थची ङ्गएक्स्कर्शनफ ही सुप्रसिद्ध कविता शिकवीत होते. तीत ङ्गएक्स्टसीफ असा एक शब्द आहे. समाधीसारख्या या स्थितीत मनाची कोणती आणि कशी अवस्था असते हे ते रंगून जाऊन वर्णन करीत होते. ईश्वराप्रत जाऊन पोहोचलेल्या माणसाला ही अवस्था प्राप्त होते असे त्यांनी सांगितले. ङ्गईश्वरफ शब्द ऐकल्यावर नरेंद्र उभा राहिला आणि त्याने विचारले, ङ्गसर, आपण ईश्वराप्रत पोहोचलेले आहात का? आपण ईश्वर पाहिला आहे का?फ प्रा. हेस्टी म्हणाले, ङ्गनाही रे मित्रा, मी देव पाहिलेला नाही पण तुला याविषयीची खरोखरच आवड आणि कळकळ असेल तर तू दक्षिणेश्वराला जा. तेथील कालीमातेचा पुजारी रामकृष्ण परमहंस नावाचा आहे. त्याला अशी वारंवार समाधी लागते आणि त्याने देव पाहिला आहे असे म्हणतात.फ नरेंद्राने यापूर्वी केव्हातरी रामकृष्ण परमहंसांचे नाव ऐकले होते पण प्राचार्यांनी त्यांचा उल्लेख केल्यावर त्याची रामकृष्णांच्या भेटीची इच्छा अधिकच तीव्र झाली.

**कथा उपदेश :** आपल्या ध्येयाबद्दल आवड आणि कळकळ असेल तर तेथे पोचण्यासाठी मार्ग मिळतोच.

## १ Doctor Tips सल्ला डॉक्टरचा



आहारातून टाळा हृदयरोगपूजा शिरभातेहृदयरोग आपल्यापासून दूर ठेवायचा असेल तर जीवनशैलीचा विचार करायला हवा त्यामध्ये आहार हा महत्त्वाचा घटक आहे...हृदयरोग आपल्यापासून दूर ठेवायचा असेल तर जीवनशैलीचा विचार करायला हवा. त्यामध्ये आहार हा महत्त्वाचा घटक आहे. योग्य आहारामुळे बरेच आजार आपल्यापासून दूर ठेवता येतात.हृदयरोगाचा धोका कमी करण्यासाठी पौष्टिक आहार हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. चांगली जीवनशैली व आहार उच्च रक्तदाब, रक्तातील कोलेस्ट्रॉल चे वाढते प्रमाण, लठ्ठपणा यांसारखे आजार टाळण्यास मदत करू शकतात.


## २ Joke विनोद




भिकारी : साहेब, एक रुपया तरी द्या. दोन दिवस जेवलो नाही.

शेठजी : एक काय दोन रुपये देतो, पण एका रुपयात जेवण कुठे मिळते ते आधी सांग!

## ३ Message संदेश




Customer: Mujhe phone per dhamkiya mill rahi hai.
Police: Kaun hai woh jo aapko dhamkiya de raha hai?

Customer: Telephone wale bolte hai ke, "Bill nahi bharoge toh kaat denge."

## ४ Thought सुविचार



जे झोपेची पर्वा करीत नाहीत त्यांनाच झोप मिळते. – इमरसन


**संस्कृत सुभाषित**

**शरदि न वर्षति गर्जति । वर्षति वर्षासु नि:स्वतो मेघ:।**

नीचो वदति न कुरुते । न वदति सुजनः करोत्येव।।

अर्थ : शरद ऋतुत मेघ नुसताच गर्जतो, वर्षा ऋतुत न गर्जणारा मेघ बरसतो, दुष्ट नुसताच बडबडतो, काही करत नाही, सज्जन बोलत नाहीत तर करूनच दाखवतात.

# मनोरंजक महाशब्दकोड्यांचा समाचार



### आडवे शब्द

१. अननुभवी
५. देवापाशी मागितलेला निर्णय
६. पवित्र
९. एक सुगंधी वनस्पती
१०. जंगलातील प्राणी
१२. वारा
१३. वाईट असल्यास आयुष्य नासवणारी
१४. नासाडी, नाश
१५. हात
१६. चटकन
१८. शपथ
१९. भाज्या घालून केलेला भात
२०. सरसकट
२२. खानदान, कूळ
२३. रमापती
२५. दारूचा प्रकार
२६. कपाळ
२७. कशा प्रकारचा?
२९. वर्ष
३१.गाडीचे छत
३३. सोन्याचा धागा
३४. सुंदर तरुणी
३५. डोळे
३६. असह्य वेदना
३८. लक्ष्मी
४२. पंचमहाभूतापैकी अग्नीचे रूप
४३. टप्प्या टप्प्याने केलेला प्रवास
४६. आकर्षक
४८. मूळ अर्थ धनुष्य, उद्धट, दांडगा (ला.)
४९. यापेक्षा फळे चिरून खाणे चांगले!
५०. च्या बरोबर
५१. क्षण (हिंदी)
५३. भंगार (हिंदी)
५५. अस्सल मातीतले
५६. खुंट, आंचळ
५७. घाबरट
५९. सुविधा
६०. हक्क सांगणारा, वैरी
६२. मध
६४. पांढुरका, कडक
६६. नासाडी, धूळधाण
६८. पत्र, टपाल
६९. गवताचे पान
७०. डोंगराचा सुळका, पोळीची किनार
७२. वाळवंटातून आलेला फुलांचा राजा
७४. स्तुती करणारा दरबारी
७५. स्वत:ला
७६. रघुपती बरोबर घेतली जाणारी रामाची आणखी दोन नावे
८०. दाक्षिणात्यांच्या जेवणातील हा पदार्थ इतका मुख्य की त्याला 'अन्न' असेच संबोधतात
८१. मृत्यू नसलेला
८२. पकडण्याचे साधन- मासा किंवा काहीही!
८३. चांदोबाची खेळण्याची जागा

### उभे शब्द

१. 'फारच मोठे प्रास्ताविक' याअर्थी प्रचलित म्हण
२. उत्तराधिकारी
३. रानरेडा
४. प्रतिष्ठा
५. गांधारीचे पुत्र
६. पोटाला चांगला नसलेला पोळीला पर्याय
७. अरण्य
८. यंदा पावसाळ्यात अशा पावसाचा अभावच होता
१०. वरपांगी
११. एवढी तरी हवीच अशी हालचाल
१२. घागरा
१३. समस्या, पेच
१५. विद्या
१७. सत्व
१८. दूध न देणारी गाय
१९. पुण्याचा रहिवासी
२१. घोडागाडी
२४. मत्स्य
२६. हिंदुस्तान
२८. चाणक्यनीती
३०. सोन्याचे नाणे
३२. उद्याच्या नंतरचा दिवस
३३. जय मिळवून देणारे
३७. विविध
३९. मस्ती, गर्व
४०. समय
४१. आजपर्यंत
४३अ. वजनाला भारी
४४. किंमत
४५. सैन्याचा दाणागोटा
४६. महात्मा गांधीजींचे नाव
४७. चषक
४८. फरशीनंतर असलेला लादीचा प्रकार
५०. सरळ मोठा वासा
५२. मनाची इच्छा
५३. टाळ्यांनी मिळालेली मोठी दाद
५४. विरोध, प्रतिबंध
५६. विषमच्या विरुद्ध
५८. भीती
६१. प्रमाणपत्र
६३. कधी रावाचा होतो, कधी याचा राव!
६५. पोस्ट ऑफीस (हिंदी)
६७. नट्टापट्टा
६९. पाचोळा
७१. खेळी
७३. पोशाखाची कळ
७४. नशीब, दैव
७५. अभिप्राय
७६. राघव
७७. संताप
७८. अग्नी, ज्वाळा
७९. अंत:करण

### आडवे उत्तरे

१.नवागत ५.कौल ६.पावन ९.मरवा १०.वनचर १२.पवन १३.संगत १४.नास १५.कर १६.लवकर १८.भाक १९.पुलाव २०.सकटनिकट २२.घराणे २३.रमावर २५.रम २६.भाल २७.कसा २९.साल ३१.टप ३३.जर ३४.रमणी ३५.नयन ३६.मरणयातना ३८.रमा ४२.तेज ४३.मजल दरमजल ४६.मोहक ४८.कोदंड ४९.रस ५०.सह ५१.पल ५३.कबाड ५५.गावरान ५६.सड ५७.भेदरट ५९.सोय ६०.दावेदार ६२.मकरंद ६४.करडा ६६.तसनस ६८.डाक ६९.पात ७०.कडा ७२.गुलाब ७४.भाट ७५.मला ७६.राघव राजाराम ८०.भात ८१.अमर ८२.गळ ८३.नभांगण


### उभे उत्तरे

१.नमनाला घडाभर तेल २.वारस ३.गवा ४.मान ५.कौरव ६.पाव ७.वन ८.संततधार १०.वरवर ११.चलनवलन १२.परकर १३.संकट १५.कला १७.कस १८.भाकड १९.पुणेकर २१.टमटम २४.मासा २६.भारत २८.साम दाम दंड भेद ३०.होन ३२.परवा ३३.जयावह ३७.नाना ३९.माज ४०.काल ४१.आजतागायत ४३अ. जड ४४.दर ४५.रसद ४६.मोहनदास ४७.कप ४८.कोबा ५०.सरा ५२.लहर ५३.कडकडाट ५४.हरकत ५६.सम ५८.डर ६१.दाखला ६३.रंक ६५.डाकघर ६७.नखरा ६९.पाला ७१.डाव ७३.बटण ७४.भाग्य ७५.मत ७६.राम ७७.राग ७८.जाळ ७९.मन




# माजी पत्नीची भेट, सोहेल खानने मानली चूक; घटस्फोटाची जबाबदारी स्वतःवर घेतली

मुंबई–घटस्फोटाच्या ४ वर्षांनंतर बॉलिवूड सुपरस्टार सलमान खानचा भाऊ, चित्रपट निर्माते व अभिनेते सोहेल खानने टेलिव्हिजनवर आपल्या माजी पत्नीची माफी मागितली असून लग्न तुटण्याची संपूर्ण जबाबदारी स्वतःवर घेतली आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, २४ वर्षांचे नाते संपल्यानंतर पहिल्यांदाच दोघांमध्ये जाहीरपणे भावनिक संवाद झाला, ज्याने चाहत्यांना चकित केले. मनोरंजन सृष्टीतील प्रसिद्ध जोडपे सोहेल खान आणि सीमा सजदेह यांनी वर्ष २०२२ मध्ये त्यांच्या २४ वर्षांच्या लग्नाचा अधिकृतपणे शेवट केला होता, मात्र दोघेही आपल्या मुलांसाठी (निर्वाण आणि योहान) सलोख्याचे संबंध ठेवून आहेत. अलीकडेच एका शोदरम्यान दोघे अचानक आमनेसामने आले, जिथे सूत्रसंचालक कुणाल खेमूच्या प्रश्नावर सोहेल खानने सर्वांना थक्क केले. सोहेल खानने हसत आपल्या माजी पत्नीकडे



पाहिले आणि म्हटले, मी या सुंदर महिलेसोबत माझ्या आयुष्याची २५ वर्षे घालवली आहेत आणि आज मी नॅशनल टेलिव्हिजनवर जाहीरपणे कबूल करतो की, जर आमच्यामध्ये काही चूक झाली असेल, तर त्याची संपूर्ण जबाबदारी मी स्वतःवर घेतो. सोहेल खानच्या या वाक्यावर सीमा भावनिक झाली, तर तिथे उपस्थित इतर सेलिब्रिटींनी टाळ्या वाजवून सोहेलच्या मनाच्या मोठेपणाचे कौतुक केले. दुसरीकडे, सीमाने 'फॅब्युलस लाइव्ह्ज व्हर्सेस बॉलिवूड वाईव्ह्ज' या रियालिटी शोमध्ये खुलासा केला की, ती आता भूतकाळ विसरून आयुष्यात पुढे गेली आहे आणि तिने तिचा माजी मंगेतर विक्रम आहुजासोबत पुन्हा नाते जोडले आहे. शोदरम्यान सीमाने तिचा मोठा मुलगा निर्वाणला विचारले, तुला मी आयुष्यात पुढे गेल्यावर काही आक्षेप किंवा राग आहे का? ज्यावर तिच्या मुलाने खात्री दिली की तो त्याच्या आईच्या आनंदात पूर्णपणे सहभागी आहे.

# गोविंदाची पत्नी सुनिता आहुजाच्या गोळी मारण्यावर गोविंदाची मजेशीर प्रतिक्रिया



मुंबई–बॉलिवूड अभिनेता गोविंदाने एका रियालिटी शोमध्ये विशेष उपस्थिती लावून त्याची पत्नी सुनिता आहुजाच्या वक्तव्यावर मजेशीर पद्धतीने प्रतिक्रिया दिली आहे. शोच्या रिलीज झालेल्या प्रोमोमध्ये गोविंदाने शोमध्ये एन्ट्री केली, जिथे सूत्रसंचालक फराह खान आणि रितेश देशमुख यांनी त्याचे स्वागत केले. संभाषणादरम्यान गोविंदाने आपल्या खास विनोदी शैलीत म्हटले, हा तो लॉकअप आहे जो दिसतो, जो दिसत नाही तो वेगळाच लॉकअप असतो, मी तिथूनच येत आहे. या प्रसंगी फराह खानने सुनिता आहुजाच्या त्या वक्तव्याचा उल्लेख केला ज्यामध्ये तिने गंमतीने म्हटले होते की ती गोविंदाला छातीत गोळी मारेल. यावर गोविंदाने हसत उत्तर दिले, अरे, मी तर खिशात गोळी घेऊन आलो आहे. ती म्हणाली होती ना की छातीत मारायची आहे, हे घ्या आता मारून घ्या. आठवून पहावे की, सुनिता आहुजाने शो दरम्यान तिच्या वैवाहिक जीवनावर मोकळेपणाने बोलताना सांगितले होते की, तिला लग्नात कठीण काळाचा सामना करावा लागला होता, परंतु प्रेमामुळे तिने हे नाते टिकवून ठेवले. तिने गोविंदाच्या भूतकाळात घडलेल्या अपघाती गोळीबाराच्या घटनेवरही हलक्या–फुलक्या पद्धतीने भाष्य केले होते. गोविंदा आणि सुनिता आहुजा यांचे लग्न १९८७ मध्ये झाले होते आणि त्यांना टीना आहुजा आणि यशवर्धन आहुजा ही दोन मुले आहेत.

# आमिर खानने घटवले १८ किलो वजन, मायग्रेनच्या त्रासातही मोठी घट



मुंबई–बॉलिवूड अभिनेता आमिर खानने खुलासा केला आहे की त्याने ६० वर्षे वयात आपले १८ किलो वजन कमी केले आहे. रंजक गोष्ट म्हणजे वजन कमी करणे हा आमिर खानका प्राथमिक उद्देश नव्हता, तर त्याला वारंवार होणाऱ्या मायग्रेनच्या (अर्धशिशी) त्रासापासून सुटका हवी होती. मीडियाला दिलेल्या नुकत्याच एका मुलाखतीत आमिर खानने सांगितले की, त्याने आरोग्यामध्ये सुधारणा करण्यासाठी 'अँटी–इन्फ्लेमेटरी' (दाहशामक) आहार पद्धतीचा अवलंब केला, ज्याचे आश्चर्यकारक परिणाम समोर आले. त्याच्या मते, या आहार पद्धतीमुळे केवळ त्याचे १८ किलो वजन कमी झाले नाही, तर मायग्रेनच्या त्रासातही लक्षणीय घट झाली. आमिर खानने त्याच्या रोजच्या संपूर्ण आहाराचा तपशील दिला नसला तरी, तो अँटी–इन्फ्लेमेटरी डाएट फॉलो करत असल्याचे त्याने सांगितले.

अँटी–इन्फ्लेमेटरी आहाराचा तपशील


आमिर खानच्या या वक्तव्यानंतर तज्ज्ञांनी त्यांचे मत मांडताना सांगितले की, हा कोणताही तात्पुरता किंवा फॅशनवर आधारित डाएट नसून ही अशी आहार प्रणाली आहे जी शरीरातील सूज (खपषश्ररारींळेप) कमी करण्यास मदत करते. हार्वर्ड हेल्थनुसार, शरीरात सतत राहणारी सूज ही हृदयरोग, मधुमेह, संधिरोग आणि इतर जुनाट आजारांशी संबंधित असू शकते. अँटी–इन्फ्लेमेटरी आहारामध्ये ताज्या आणि नैसर्गिक अन्नाला प्राधान्य दिले जाते, तर प्रोसेस्ड (प्रक्रिया केलेल्या) अन्नाचे सेवन टाळले जाते.

आहारात समाविष्ट असणाऱ्या गोष्टी: रंगीबेरंगी फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, ओट्स, ब्राऊन राईस, क्विनोआ, बाजरी, डाळी, शेंगा, सुका मेवा, बिया, ऑलिव्ह ऑइल, व्होकॅडो ऑइल आणि ओमेगा–३ समृद्ध मासे.

पेये: तज्ज्ञांच्या मते, या डाएट प्लॅन दरम्यान संयम राखून ग्रीन टी, दूध नसलेला कोरा चहा आणि कॉफीचाही वापर केला जाऊ शकतो.

वर्ज्य असणाऱ्या गोष्टी: गोड पदार्थ, गोड पेये, चॉकलेट्स, पॅकबंद मिठाई, मैद्यापासून बनवलेल्या वस्तू, तळलेले अन्न, प्रोसेस्ड फूड आणि ट्रान्स फॅट्स असलेल्या गोष्टी पूर्णपणे टाळल्या जातात.एका वैद्यकीय संशोधनानुसार, अँटी–इन्फ्लेमेटरी आहार शरीरातील आजारांची लक्षणे कमी करण्यासाठी, उत्तम झोप, अधिक ऊर्जा, वजनाचा समतोल आणि सांध्यांचे आरोग्य सुधारण्यासाठी मदतगार ठरतो. आमिर खानने भूतकाळात चित्रपटातील पात्रांसाठी अनेकदा आपल्या शरीराच्या वजनात आणि आकारात मोठे बदल केले आहेत, मात्र यावेळी त्याने कोणत्याही चित्रपटाच्या पात्रासाठी नव्हे, तर स्वतःच्या आरोग्यासाठी आणि चांगल्या जीवनमानासाठी हा बदल स्वीकारला आहे.

# डीपफेक प्रकरण: न्यायालयाने प्रीती झिंटाला दिला अंतरिम दिलासा



मुंबई–बॉलिवूडची मडिंपल क्वीनफ अभिनेत्री प्रीती झिंटाला डीपफेक प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाकडून अंतरिम दिलासा मिळाला आहे. मुंबई उच्च न्यायालयाने अभिनेत्री प्रीती झिंटाला तिच्याविरुद्ध आर्टिफिशिअल इंटेलिजन्स (–ख) द्वारे तयार केलेले डीपफेक साहित्य, छेडछाड केलेले फोटो, बनावट व्हिडिओ आणि तिच्या ओळखीचा अनधिकृत वापर करून ऑनलाइन प्रसारित केलेल्या इतर साहित्यांच्या विरोधात अंतरिम संरक्षण दिले आहे. खटल्याच्या सुनावणीदरम्यान न्यायालयाने टिप्पणी केली की, एआय (–ख) च्या माध्यमातून बनावट साहित्य तयार करणे हे कोणत्याही व्यक्तीच्या वैयक्तिक अधिकारांचे, प्रसिद्धीच्या अधिकारांचे आणि प्रतिष्ठेने जगण्याच्या मूलभूत अधिकाराचे गंभीर उल्लंघन ठरू शकते. न्यायालयाने म्हटले की, कोणत्याही प्रसिद्ध व्यक्तीचा फोटो, ओळख किंवा साधर्म्याचा अनधिकृत वापर केवळ तिच्या प्रतिमेलाच हानी पोहोचवत नाही, तर सार्वजनिक विश्वासावरही परिणाम करू शकतो. उच्च न्यायालयाने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सच्या जबाबदारीवर भर देत म्हटले की, मध्यस्थ प्लॅटफॉर्म्सनी त्यांच्या प्लॅटफॉर्मचा गैरवापर रोखण्यासाठी प्रभावी पावले उचलणे आणि माहिती तंत्रज्ञान (खढ) नियमांतर्गत त्यांच्या कायदेशीर जबाबदाऱ्या पूर्ण करणे आवश्यक आहे. न्यायालयाने म्हटले की, अशा बनावट साहित्याविरुद्ध वेळेवर केलेली कारवाई केवळ नागरिकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी मदत करणार नाही, तर वारंवार उल्लंघन करणाऱ्या घटकांना आळा घालेल. सुनावणी दरम्यान प्रीती झिंटाच्या कायदेशीर टीमने न्यायालयाला सांगितले की, इंटरनेटवर शेकडो लिंक्स उपलब्ध आहेत ज्यामध्ये कथितपणे एआय द्वारे तयार केलेले किंवा छेडछाड केलेले फोटो आणि व्हिडिओ आहेत, ज्यामध्ये अभिनेत्रीला खोट्या आणि दिशाभूल करणाऱ्या पद्धतीने दाखवण्यात आले आहे. न्यायालयाने प्रथमदर्शनी खटल्यात तथ्य असल्याचे मानत अभिनेत्रीला अंतरिम दिलासा दिला. दरम्यान, अभिनेत्री आणि आयपीएल फ्रँचायझी मपंजाब किंग्सफ्ची सह–मालक प्रीती झिंटाने तिच्या ओळखीचा अनधिकृत वापर आणि एआय–निर्मित डीपफेक साहित्याविरोधात कायदेशीर कारवाई करत मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. ५१ वर्षीय अभिनेत्रीने गुगल, मिटा, डोमेन रजिस्ट्रार आणि इतरांविरुद्ध खटला दाखल करत भूमिका घेतली होती की, तिच्या परवानगीशिवाय तिची ओळख आणि फोटोंचा वापर करून एआय डीपफेक साहित्य ऑनलाइन प्रसारित केले गेले, ज्यामुळे तिची प्रतिमा आणि गोपनीयतेवर परिणाम झाला आहे.

# मानव गोहिल यांचा जीवनप्रवास आणि कारकीर्द



टुडे बर्ड डे स्पेशल

भारतीय मनोरंजन विश्वात आपल्या अष्टपैलू अभिनयाने आणि भारदस्त व्यक्तिमत्त्वाने स्वतःची वेगळी ओळख निर्माण करणारे अभिनेते म्हणजे मानव गोहिल. गेली दोन दशकांहून अधिक काळ ते हिंदी दूरदर्शन, चित्रपट आणि रंगभूमीवर सक्रिय आहेत. साध्या कौव्हेंटिक किंवा कौटुंबिक मालिकांपासून ते ऐतिहासिक भूमिकांपर्यंत त्यांनी साकारलेली प्रत्येक व्यक्तिरेखा प्रेक्षकांच्या मनावर राज्य करत आली आहे.

खाली मानव गोहिल यांच्या सुरुवातीच्या जीवनापासून ते त्यांच्या आजवरच्या यशस्वी कारकिर्दीचा सविस्तर इतिहास दिला आहे:

१. सुरुवातीचे जीवन आणि शिक्षण

मानव गोहिल यांचा जन्म ९ नोव्हेंबर १९७४ रोजी गुजरात मधील सुरेंद्रनगर येथे झाला. त्यांचे सुरुवातीचे संगोपन गुजरातमध्येच झाले. पुढील शिक्षणासाठी ते बडोदा (वडोदरा) येथे स्थलांतरित झाले. त्यांनी वाणिज्य शाखेतून आपली पदवी पूर्ण केली आणि त्यानंतर व्यवस्थापन शास्त्राची पदव्युत्तर पदवी देखील संपादन केली. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी मर्मन ऑफ गुजरातफ या सौंदर्य स्पर्धेत भाग घेतला आणि ती स्पर्धा जिंकली. या यशामुळे त्यांना चंदेरी जगताची ओढ लागली. अभिनयात नशीब आजमावण्यासाठी त्यांनी बडोदा सोडून मुंबई गाठली आणि प्रख्यात अभिनय प्रशिक्षक किशोर नमित कपूर यांच्याकडून अभिनयाचे रीतसर धडे घेतले.

२. दूरदर्शनवरील पदार्पण आणि सुरुवातीचा संघर्ष

मानव गोहिल यांनी २००० च्या दशकाच्या सुरुवातीला आपल्या अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. त्यांचा दूरदर्शनवरील पहिला पदार्पणाचा कार्यक्रम मचुडियाँफ (२००१) हा होता. या मालिकेनंतर त्यांना खऱ्या अर्थाने ओळख मिळाली ती एकता कपूर यांच्या अत्यंत लोकप्रिय मकहानी घर घर कीफ या मालिकेतील मविक्रमम या भूमिकेमुळे.

यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी एकापाठोपाठ एक अनेक गाजलेल्या मालिकांमध्ये काम केले:कुसुम: विशाल मेहराची भूमिका.

कसौटी जिंदगी की: प्रविण सेनगुप्ताची भूमिका.

सी.आय.डी.: या भारतातील सर्वात प्रदीर्घ चालणाऱ्या गुन्हेगारी मालिकेत त्यांनी मइन्स्पेक्टर दक्षफ्ची भूमिका साकारून प्रचंड लोकप्रियता मिळवली.

रेमिक्स: देवाशिष मित्रा यांच्या भूमिकेत ते दिसले.

३. कारकिर्दीतील सुवर्णकाळ आणि ऐतिहासिक भूमिका

मानव गोहिल यांच्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाचे टप्पे आले, ज्यांनी त्यांना दूरदर्शन जगतातील एक प्रस्थापित अभिनेता बनवले.

द बडी प्रोजेक्ट: २०१२ ते २०१४ दरम्यान आलेल्या या युवा पिढीवर आधारित कार्यक्रमात त्यांनी मअनिरुद्ध जैतलीफ (जंगली सर) या शिक्षकाची भूमिका साकारली, ज्याला तरुणांनी खूप पसंत केले.

यम है हम: या हलक्या–फुलक्या विनोदी मालिकेत त्यांनी मुख्य मयमराजफ्ची भूमिका साकारून आपल्यातील विनोदी अंगही प्रेक्षकांसमोर आणले.

तेनाली रामा: २०१७ मध्ये आलेल्या या ऐतिहासिक मालिकेत त्यांनी ममहाराज कृष्णदेवरायफ ही अत्यंत वजनदार आणि मुख्य भूमिका साकारली. या भूमिकेसाठी त्यांचे विशेष कौतुक झाले आणि हा त्यांच्या कारकिर्दीतील मैलाचा दगड ठरला.

शादी मुबारक: २०२० मध्ये या मालिकेत त्यांनी मकीर्तन टिबरेवालफ ही रोमँटिक आणि समजूतदार व्यक्तीची भूमिका साकारली.

त्यानंतर त्यांनी मकामनाफ, ममै हूं अपराजिताफ आणि मदबंगई – मुल्गी आली रे आलीफ यांसारख्या मालिकांमधून आपल्या अभिनयाची छाप सोडली.

४. रिॲलिटी शो आणि रंगभूमी

केवळ मालिकाच नव्हे, तर मानव गोहिल यांनी अनेक लोकप्रिय वास्तववादी कार्यक्रमांमध्ये (रिॲलिटी शो) देखील भाग घेतला आणि त्यांचे सूत्रसंचालन केले.

त्यांनी मफेम गुरुकुलफ या प्रसिद्ध गायन स्पर्धेचे सूत्रसंचालन केले.

त्यांनी मफिअर फॅक्टर इंडियाफ या साहसी कार्यक्रमात स्पर्धक म्हणून भाग घेतला.नच बलिये २: या प्रसिद्ध नृत्य स्पर्धेत त्यांनी आपली पत्नी श्वेता क्वात्रासोबत सहभाग घेतला होता. या कार्यक्रमात प्रख्यात नृत्यदिग्दर्शक सरोज खान यांनी मानव यांना मसर्वोत्कृष्ट नर्तकफ पुरस्कार देऊन गौरवले होते.याशिवाय त्यांनी मकेनेडी ब्रिजफ, मसर सर सरलाफ आणि मलेडी फ्रॉम द ओशनफ यांसारख्या प्रसिद्ध व्यावसायिक नाटकांमध्ये काम करून रंगभूमीवरही आपले कौशल्य सिद्ध केले.

५. चित्रपट आणि जाळे–मालिकांमधील कामगिरी

मानव गोहिल यांनी बॉलिवूडसह प्रादेशिक चित्रपटांमध्येही मोलाचे योगदान दिले आहे: हिंदी चित्रपट: त्यांनी हृतिक रोशन स्टारर मसुपर ३०फ मध्ये आयएएस पुरुषोत्तम सिंग यांची भूमिका साकारली. याशिवाय मबागी ३फ, नेटफ्लिक्सवरील मत्रिभंगाफ आणि अलीकडील मधुरंधरफ या चित्रपटांमध्ये ते महत्त्वपूर्ण भूमिकांमध्ये दिसले.

प्रादेशिक चित्रपट (गुजराती सिनेमा): गुजराती चित्रपटसृष्टीत त्यांनी अमिताभ बच्चन यांच्या कंपनीने निर्मित केलेल्या मसप्तपदीफ (२०१३) या चित्रपटातून पदार्पण केले. हा चित्रपट कमालीचा यशस्वी ठरला आणि जयपूर आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवातही दाखवला गेला. यानंतर त्यांनी मधंत्या ओपनफ, मचांदलोफ आणि ममौजे दर्याफ या गुजराती चित्रपटांमध्ये काम केले.

वेब सिरीज (जाळे–मालिका): डिजिटल माध्यमात त्यांनी शेमारूवरील ममत्स्यवेधफ या मालिकेत काम केले आहे.

६. वैयक्तिक जीवन

मानव गोहिल यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल सांगायचे तर, त्यांनी त्यांची सह–कलाकार आणि दूरदर्शन विश्वातील प्रसिद्ध अभिनेत्री श्वेता क्वात्रा हिच्याशी २५ डिसेंबर २००४ रोजी लग्न केले. मकहानी घर घर कीफ आणि मकुसुमम मालिकेच्या सेटवर शववळपस त्यांची मैत्री झाली होती, ज्याचे रूपांतर पुढे प्रेमात झाले. ११ मे २०१२ रोजी त्यांना एक मुलगी झाली.

हे दांपत्य आध्यात्मिक दृष्ट्या मनिचिरेन बौद्ध धर्मफ चे पालन करते. मानव गोहिल हे त्यांच्या नम्र, शांत आणि शिस्तप्रिय स्वभावासाठी ओळखले जातात. अभिनयाव्यतिरिक्त ते अनेक सामाजिक कार्यात आणि सेवाभावी संस्थांमध्येही सक्रिय असतात.

**निष्कर्ष–थोडक्यात सांगायचे तर, मानव गोहिल यांचा सुरेंद्रनगर (गुजरात) ते मुंबईच्या चंदेरी दुनियेपर्यंतचा प्रवास अत्यंत प्रेरणादायी आहे. कोणत्याही गॉडफादरशिवाय केवळ स्वतःची मेहनत, अष्टपैलू अभिनय आणि आवाजातील जरब याच्या जोरावर त्यांनी भारतीय दूरदर्शन विश्वात आपले अढळ स्थान निर्माण केले आहे. आज एक परिपक्व आणि प्रतिभावान अभिनेता म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते.**

# महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेतील गैरव्यवहार प्रकरणी विशेष तपास पथक स्थापन करणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी:** नाशिक जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहारांच्या चौकशी करण्यात येत आहे. यासाठी नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात येणार असून त्यात विविध विभागांतील तज्ज्ञांचा समावेश असेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली.



एकत्रित आयुष्मान भारत -प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना आढावा बैठक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली विधीमंडळात झाली, त्यावेळी ते बोलत होते. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर, सार्वजनिक आरोग्य राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, राज्यमंत्री पंकज भोयर, आमदार डॉ. राहुल आहेर, अध्यक्ष आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समिती डॉ. ओमप्रकाश शेटे, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ निपुण विनायक, सचिव ई रवींद्रन, पोलीस महासंचालक सदानंद दाते, नाशिक विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम, राज्य आरोग्य हमी सोसायटीचे मुख्य कार्यकारी अधिकारी अण्णासाहेब चव्हाण आणि संबंधित अधिकारी यावेळी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, राज्य आरोग्य हमी सोसायटीच्या २०२४ ते २०२६ या कालावधीतील तपासणीत सुमारे १६ हजार संशयित दावे व शस्त्रक्रियांची नोंद आढळली आहे. त्यापैकी ९,५०० प्रकरणे नाशिक जिल्ह्यातील आहेत. या प्रकरणी नाशिकमधील पाच रुग्णालयांची मान्यता रद्द करण्यात आली आहे. संपूर्ण प्रकरणाच्या सखोल चौकशीसाठी विभागीय आयुक्त प्रवीण गेडाम यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात येणार आहे. पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल. अपहार झालेल्या निधीची वसुली केली जाईल; तसेच भविष्यातील गैरव्यवहार रोखण्यासाठी आवश्यक उपाययोजनाही करण्यात येतील.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले की, गरीब आणि गरजू नागरिकांना दर्जेदार व पारदर्शक आरोग्यसेवा उपलब्ध करून देणे ही शासनाची सर्वोच्च प्राथमिकता आहे. जनआरोग्य योजनांमध्ये कोणत्याही प्रकारचा गैरव्यवहार सहन केला जाणार नाही. आधुनिक तंत्रज्ञान, डेटा विश्लेषण, सायबर तपास आणि कठोर लेखापरीक्षणाच्या माध्यमातून फसवणुकीवर प्रभावी नियंत्रण आणून योजनांवरील जनतेचा विश्वास अधिक दृढ केला जाईल.

संशयास्पद सुमारे १३ लाख संभाव्य फसवणूक प्रकरणांची अत्याधुनिक विश्लेषण प्रणालीद्वारे छाननी करून त्यांची सखोल तपासणी करण्यात येईल. या प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि डेटा ॲनालिटिक्सचा अधिक प्रभावी वापर करण्यात येणार आहे.योजनेतील सायबर स्वरूपाच्या फसवणुकीवर नियंत्रण मिळविण्यासाठी महाराष्ट्र सायबर पोलिसांचा सक्रिय सहभाग घेण्यात येणार आहे. आरोग्य क्षेत्रातील डिजिटल व्यवहारांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांवर तातडीने कारवाई करण्यासाठी समन्वित यंत्रणा विकसित करण्यात येणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

अत्यंत मोठ्या रकमेच्या उपचार दाव्यांचे विशेष लेखापरीक्षण (audit) करण्यात येणार आहे. प्रत्येक प्रकरणाची स्वतंत्र पडताळणी केली जाईल. संशयास्पद आणि पूर्वीपासून चिन्हांकित करण्यात आलेल्या सर्व प्रकरणांचे फॉरेन्सिक ऑडिट करून आवश्यक ती कायदेशीर कारवाई करण्यात येईल. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात समर्पित फसवणूक प्रतिबंधक यंत्रणा उभारण्यात येणार आहे. या यंत्रणेला अत्याधुनिक डॅशबोर्ड प्रणाली जोडण्यात येईल, ज्यामुळे संशयास्पद व्यवहारांचे रिअल-टाइम निरीक्षण, विश्लेषण आणि तातडीने कारवाई करणे शक्य होईल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

राज्य शासनाच्या या निर्णयांमुळे प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेची पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि विश्वासार्हता अधिक मजबूत होणार असून, लाभार्थ्यांना योजनांचा लाभ अधिक सुरक्षित, कार्यक्षम आणि प्रभावी पद्धतीने मिळण्यास मदत होणार आहे.

आमदार राहुल आहेर यांनी नाशिक जिल्ह्यात महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत झालेल्या कथित गैरव्यवहाराबाबत यावेळी सविस्तर माहिती दिली.

## लातूर भूषण पुरस्काराने शरद झरे यांचा गौरव



**लातूर/प्रतिनिधी:** रोटरी क्लब लातूर मेट्रोतर्फे सन २०२६-२७ चा मानाचा 'लातूर भूषण' पुरस्कार माणूस प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष तथा माझं घर प्रकल्पाचे प्रमुख शरद झरे यांना प्रदान करण्यात आला हा पुरस्कार रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे प्रांतपाल रो. जयेश पटेल आणि फर्स्ट लेडी पारुल पटेल यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

शरद झरे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सुमारे ७० अनाथ व गरजू बालकांचे संगोपन करत समाजसेवेचे उल्लेखनीय कार्य उभे केले आहे. त्यांच्या या निःस्वार्थ सामाजिक योगदानाची दखल घेत रोटरी क्लब लातूर मेट्रोतर्फे यावर्षीच्या 'लातूर भूषण' पुरस्कारासाठी त्यांची निवड करण्यात आली.

यावेळी रोटरी क्लब लातूर मेट्रोचे अध्यक्ष रो. विजय कोळी, सचिव रो. मनोज सूर्यवंशी, सहसचिव रो. दत्ता बेडके, उपप्रांतपाल रो. शिवशंकर पाटील, प्रोजेक्ट चेअरमन रो. ज्ञानेश्वर जाधव, तसेच रोटरीचे सदस्य आणि विविध क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रो. कालिदास लांडगे आणि रो. संतोष कासले यांनी केले, तर रो. मनोज सूर्यवंशी यांनी आभार प्रदर्शन केले.

शरद झरे यांच्या या सन्मानाबद्दल सामाजिक, शैक्षणिक आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## केंद्रीय प्रवेश प्रक्रियेतून प्रवेशित इ. ११वी विद्यार्थ्यांचे दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात उत्साहात स्वागत




**लातूर/प्रतिनिधी :** दिनांक १० जुलै २०२६ रोजी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ इयत्या अकरावी वर्गातील विद्यार्थ्यांचे स्वागत दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयात करण्यात आले . याप्रसंगी दयानंद वाणिज्य कनिष्ठ महाविद्यालयाचे समन्वयक डॉ. सुभाष मोरे यांनी प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या तासिका, वर्ग खोल्या व महाविद्यालयाची शिस्त इत्यादी बाबत मार्गदर्शन व शुभेच्छा दिल्या तसेच उत्साही वातावरणात महाविद्यालयात पुष्पगुच्छ देत नवप्रवेशित विद्यार्थ्यांचे स्वागत डॉ, प्रशांत मान्नीकर व प्रशासकीय अधिकारी प्रा. ऋतुजा देशमुख समन्वयक डॉ.सुभाष मोरे,कार्यालयीन अधिक्षक (क,म.)श्री फैयाज पठाण यांनी केले.व तसेच प्राचार्य यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना सांगितले,उपलब्ध असणारे तज्ञ शिक्षक व महाविद्यालयातील ग्रंथालय व सुविधा इत्यादीचा पुरेपूर वापर करून.दयानंद जी यशाची परंपरा कायम राखत तुम्ही देखील उज्वल यश संपादन कराल अशी आशा व्यक्त केली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.अर्चना गुंजाळ यांनी केले,कार्यक्रमास शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' माहितीपटाचा प्रीमियर

**मुंबई/प्रतिनिधी:** माहिती व जनसंपर्क महासंचालनालय आणि वॉर्नर ब्रदर डिस्कव्हरी वाहिनी संयुक्तपणे निर्मित 'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' या माहितीपटाचा आयनॉक्स चित्रपटगृहात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत प्रीमियर शो झाला.



या 'प्रीमियर शो'साठी विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे, कौशल्य विकास मंत्री मंगलप्रभात लोढा, आमदार प्रवीण दरेकर, आमदार निरंजन डावखरे, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह, सामान्य प्रशासन विभागाच्या उपसचिव समृद्धी अनगोळकर, संचालक डॉ. किशोर गांगुर्डे, गोविंद अहंकारी, सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव अजय भोसले, उपसंचालक वर्षा आंधळे, आदी उपस्थित होते.

हा माहितीपट पंढरपूर वारीची प्रत्यक्ष अनुभूती देतो. या चित्रपटागृहामध्ये जणू काही पंढरपूरची वारी प्रत्यक्षात उतरली असल्याचेही अनुभव येत असल्याच्या भावना उपस्थितांनी व्यक्त केल्या.

**थोडक्यात माहितीपट**

'पंढरपूर वारी आणि संतांच्या पाऊलखुणा' हा २२ मिनिटांचा माहितीपट वॉर्नर ब्रदर्स डिस्कव्हरी यांच्या सहकार्याने तयार करण्यात आला आहे. या माहितीपटाचे मराठी, इंग्रजी, हिंदी, तमिळ, तेलगु, बंगाली, कन्नड, मल्याळम या भाषांमध्ये डबिंग करुन त्याचे डिस्कव्हरीच्या विविध उपग्रह वाहिन्यांवरुन प्रसारण करण्यात येत आहे. विविध भाषांमधील या माहितीपटाचे प्रसारण डिस्कव्हरी, डिस्कव्हरी एचडी, टीएलसी, टीएलसी एचडी, ॲनिमल प्लॅनेट, ॲनिमल प्लॅनेट एचडी, इन्व्हेस्टिगेशन डिस्कव्हरी (आयडी), डिस्कव्हरी सायन्स, डिस्कव्हरी टर्बो अशा ९ वाहिन्यांवरुन करण्यात येत आहे.

## लातूरमध्ये मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी 'विशेष सखोल पुनरीक्षण' मोहीम सुरु

**लातूर/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार लातूर जिल्ह्यामध्ये मतदारयादी अद्ययावत करण्यासाठी 'विशेष सखोल पुनरीक्षण' कार्यक्रम सुरू करण्यात आला आहे. या मोहिमेअंतर्गत सन २००२ च्या मतदार यादीशी सर्व मतदारांचे मॅपिंग करणे आवश्यक असून, जर मतदारांचे मॅपिंग झाले नाही तर त्यांना सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या वेळी मतदार नोंदणी अधिकाऱ्यांसमोरील सुनावणीच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागणार आहे. या कामासाठी जिल्हा निवडणूक अधिकाऱ्यांनी सर्व मतदार केंद्रस्तरीय अधिकारी व पर्यवेक्षकांना ०१ जुलै २०२६ ते १५ जुलै २०२६ या कालावधीत पूर्णवेळ कामाकरिता कार्यमुक्त केले असून, अस्पष्ट फोटो गोळा करून अद्ययावत करणे व डीएसई नोंदींची पडताळणी करण्याचे आदेश दिले आहेत.

या विशेष मोहिमेअंतर्गत मतदार केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) ३० जून २०२६ ते २९ जुलै २०२६ या कालावधीत मतदारांच्या घरोघरी भेट देऊन माहिती संकलन आणि डिजिटायझेशनची कामे पूर्ण करणार आहेत. मतदारांना या विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रमात योग्य मार्गदर्शन मिळावे यासाठी सर्व बीएलओ रोज संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत आपापल्या मतदान केंद्रांवर उपस्थित राहणार आहेत.

या महत्त्वाकांक्षी मोहिमेचे वेळापत्रक निश्चित करण्यात आले असून, त्यानुसार २० जून २०२६ ते २९ जून २०२६ या कालावधीत बीएलओ प्रशिक्षण व मतदार यादी छपाईचे काम पूर्ण झाले आहे. यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदारयादी प्रसिद्ध केली जाईल आणि त्यानंतर ०५ ऑगस्ट २०२६ ते दि. ०४ सप्टेंबर २०२६ या कालावधीत नागरिकांना आपले दावे व हरकती दाखल करता येतील. हे प्राप्त झालेले दावे व हरकती ०५ ऑगस्ट २०२६ ते ०३ ऑक्टोबर २०२६ या नोटीस टप्प्यात निकाली काढले जातील. ०७ ऑक्टोबर २०२६ रोजी अंतिम मतदार यादी नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केली जाईल.

या मोहिमेत जास्तीत जास्त पात्र नागरिकांची नाव नोंदणी व्हावी आणि मतदार यादी अचूक व्हावी, यासाठी सर्व मतदारांनी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत आपल्या मतदान केंद्रावर जाऊन बीएलओ यांची भेट घ्यावी आणि मतदार यादी अद्ययावत करण्यासाठी प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन लातूरच्या

## मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमांतर्गत लातूर जिल्ह्यात १४ जुलैपासून तालुकास्तरीय मेळाव्यांचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** राज्याच्या नवीन औद्योगिक धोरण-२०१९ अंतर्गत शहरी व ग्रामीण भागातील सुशिक्षित युवक-युवतींना स्वयंरोजगार आणि रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम' योजना राबविण्यात येत आहे. या योजनेची व्याप्ती आणि माहिती जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी लातूर जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमध्ये 'तालुकास्तरीय मेळाव्यांचे' आयोजन करण्यात आले असून या मेळाव्यांमध्ये योजनेची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. हे सर्व तालुकास्तरीय मेळावे संबंधित तालुक्याच्या पंचायत समिती येथे सकाळी ११:३० वाजता आयोजित करण्यात येणार आहेत.

यामध्ये १४ जुलै रोजी अहमदपूर, १५ जुलै रोजी औसा, १६ जुलै रोजी चाकूर, १७ जुलै रोजी शिरुर अनंतपाळ, २१ जुलै रोजी देवणी, २२ जुलै रोजी उदगीर, २३ जुलै रोजी जळकोट, २४ जुलै रोजी निलंगा, २७ जुलै रोजी रेणापूर आणि २८ जुलै रोजी लातूर येथील पंचायत समितीमध्ये मेळावा होईल. मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवारांनी आधार कार्ड, पॅनकार्ड, शाळा सोडल्याचा दाखला (टी.सी.), पासपोर्ट साईझ फोटो आणि ग्रामीण भागासाठी लोकसंख्या प्रमाणपत्र या आवश्यक कागदपत्रांसह संबंधित मेळाव्यास उपस्थित राहावे, असे आवाहन लातूर जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक निखिल पाटील यांनी केले

# 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' शेतकऱ्यांना दिलासा आणि आर्थिक सक्षमतेसाठी बळ !

बदलते हवामान, अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, वाढता उत्पादन खर्च आणि शेतीमालाच्या बाजारभावातील अनिश्चितता यामुळे अनेक शेतकऱ्यांना आर्थिक संकटांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देत त्यांना नव्याने उभे करण्यासाठी राज्य शासनाने 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६' हा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. ही योजना शेतकऱ्यांना आर्थिक सक्षमतेकडे नेणारी ठरणार आहे. शेतकऱ्यांच्या आर्थिक पुनर्बांधणीचा, आत्मविश्वास वृद्धीचा आणि शेती व्यवसायाला अधिक सक्षम करण्याचा हा एक व्यापक प्रयत्न आहे.

**५६ लाखांहून अधिक शेतकऱ्यांना मोठा दिलासा**

राज्य शासनाच्या या महत्त्वाकांक्षी योजनेचा लाभ राज्यातील सुमारे ५६ लाखांहून अधिक पात्र शेतकऱ्यांना मिळणार असून सुमारे ३६ हजार ५८५ कोटी रुपयांची मदत उपलब्ध करून दिली जाणार आहे. राज्याच्या इतिहासातील मोठ्या कर्जमुक्ती उपक्रमांपैकी ही एक योजना मानली जात आहे.




या योजनेअंतर्गत पात्र थकबाकीदार शेतकऱ्यांच्या दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाला कर्जमुक्तीचा लाभ मिळणार आहे. त्यामुळे आर्थिक अडचणींमुळे कर्जफेड करू न शकलेल्या शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

**मोठ्या थकबाकीदारांसाठी एकवेळ समझोता योजना**

ज्या पात्र शेतकऱ्यांची थकबाकी दोन लाख रुपयांपेक्षा अधिक आहे, अशा शेतकऱ्यांसाठी एकवेळ समझोता (जपश ढळाश डशीींश्रशाशपीं - जढड) योजना लागू करण्यात आली आहे. संबंधित शेतकऱ्यांनी दोन लाख रुपयांपेक्षा जास्त असलेली थकबाकी भरल्यानंतर शासनाकडून त्यांच्या कर्जखात्यात दोन लाख रुपयांपर्यंतची मदत जमा करण्यात येणार आहे. या निर्णयामुळे मोठ्या कर्जाच्या ओझ्याखाली असलेल्या शेतकऱ्यांनाही दिलासा मिळून ते पुन्हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होणार आहे.

**नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही सन्मान**

कर्जमुक्ती योजनेमध्ये शासनाने नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांचाही विचार केला आहे. आर्थिक शिस्त राखत वेळेवर कर्जफेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर लाभ देण्यात येणार आहे. त्यामुळे प्रामाणिकपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन मिळून कर्ज व्यवहारातील शिस्त अधिक बळकट होणार आहे.

**पारदर्शक अंमलबजावणीसाठी डिजिटल प्रणालीचा वापर**

योजनेची अंमलबजावणी जलद, अचूक आणि पारदर्शक व्हावी यासाठी शासनाने आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर केला आहे. महाआयटीच्या सहकार्याने विकसित करण्यात आलेल्या विशेष ऑनलाइन पोर्टलच्या माध्यमातून पात्र शेतकऱ्यांची माहिती संकलित करण्यात येत आहे. व्यापारी बँका, जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका, प्राथमिक कृषी पतसंस्था आणि संबंधित विभागांकडून कर्जखात्यांची माहिती पोर्टलवर नोंदविण्यात येत आहे. संगणकीय पडताळणी, आधार प्रमाणीकरण आणि थेट लाभ हस्तांतरण प्रणालीद्वारे पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात लाभाची रक्कम जमा केली जाणार आहे.

**आधार प्रमाणीकरण आणि ग्रीस्टॅक नोंदणी महत्त्वाची**

योजनेचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचावा यासाठी आधार प्रमाणीकरणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी आपले आधार कार्ड बँक खात्याशी संलग्न असल्याची खात्री करावी. तसेच ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करणे आवश्यक आहे. यासोबतच ग्रीस्टॅक नोंदणी, सातबारा उतारा, कर्ज खात्याचा तपशील, आधार कार्ड, बँक पासबुक आदी आवश्यक माहिती अद्ययावत ठेवणे गरजेचे आहे. शेतकऱ्यांनी कोणत्याही मध्यस्थ किंवा दलालांवर विश्वास न ठेवता संबंधित बँक, सहकारी संस्था अथवा अधिकृत केंद्राशीच संपर्क साधावा.

**शाश्वत शेतीसाठी शासनाचे विविध उपक्रम**

शेतकरी कल्याणाचा व्यापक दृष्टिकोन ठेवून शासनाकडून जलसंधारण, सौर कृषी पंप, कृषी यांत्रिकीकरण, सिंचन सुविधा, प्रमाणित बियाणे, आधुनिक तंत्रज्ञान, कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित कृषी उपाययोजना आणि हवामानपूरक शेतीसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. कर्जमुक्ती योजनेसोबत या सर्व उपाययोजनांमुळे शेती अधिक सक्षम, शाश्वत आणि स्पर्धात्मक होण्यास मदत होणार आहे.

# उमरग्यात २३ जणांनी दिली वीरशैव सिद्धांत प्रबोध, प्रवीण, पंडित परीक्षा; महिलांचा सहभाग अधिक



उमरगा(प्रतिनिधी)-वीरशैव सिद्धांत प्रबोध परीक्षा वीरशैव धर्माचे तत्त्वज्ञान व शिकवणूक समजून घेण्यासाठी घेतली जाते. ही परीक्षा वीरशैव धर्म संस्थापक व प्रमुख विचारसरणीवर आधारित असते. या परीक्षेत वीरशैव धर्माचे मूळ तत्त्वज्ञान, शैवगम व वीरशैव धर्माचे विचारांवरतीच प्रश्न विचारले जातात. एकूण २३ परीक्षार्थींनीही परीक्षा दिली. श्री काशी जगद्गुरू वीरशैव विश्वाराध्य विद्यापीठ जंगमवाडी मठ वाराणसी यांच्या वतीने वीरशैव सिद्धांत प्रबोध,वीरशैव सिद्धांत प्रवीण व पंडित परीक्षा रविवारी (दि. ५) उमरगा येथील वीरशैव सभागृह चौकी मठ येथे घेण्यात आली. वीरशैव सिद्धांत प्रवीण परीक्षेसाठी १८ परीक्षार्थी व वीरशैव सिद्धांत प्रबोध परीक्षा एक परीक्षार्थींनी तर पंडित परीक्षा चार जणांनी दिली. सकाळी ११ ते दोन दरम्यान ही परीक्षा दिली.

या वेळी परीक्षा केंद्र संचालक सरीता उपासे, मीनाक्षी शिवानंद माशाळकर यांनी काम पाहिले. या परीक्षेच्या यशस्वितेसाठी वीरशैव महिला मंडळ अध्यक्षा राजश्री शिवशंकर माळगे, मायादेवी बसवराज स्वामी, प्रतिभा जगन्नाथ माशाळकर आदींनी परिश्रम घेतले. परीक्षा पर्यवेक्षक म्हणून सरिता उपासे-वैरागकर यांनी काम पाहिले. या परीक्षेसाठी मीनाक्षी माशाळकर, राजश्री माळगे, माया स्वामी, प्रतिभा माशाळकर, सुषमा दामशेट्टी, सविता व्हंडरे, छाया माशाळकर, सोनी खसगे, शीतल खसगे, प्रमिला माळगे, पुष्पा हेबळे आदी सहभागी झाले होते.

शिव हे परम तत्त्व, तो जगाचा सार, धर्माची विचारसरणी व इतिहास माहिती असावा या वेळी उपासे म्हणाल्या, वीरशैव धर्माचे प्रमुख तत्त्वज्ञान वीरशैव धर्मात शिव हे परम तत्त्व आहे, तो जगाचा सार आहे, जगाचा आत्मा आहे. वीरशैव धर्माचे धर्मग्रंथ शैवगम नुसार, शिव हा परम तत्त्व आहे. या अंतर्गत १८ शैवगम येतात. परीक्षेच्या तयारीसाठी वीरशैव धर्माचे तत्त्वज्ञान व शैवगम यावर आधारित पुस्तके व साहित्य वाचणे आवश्यक आहे. वीरशैव धर्माची प्रमुख विचारसरणी व इतिहासावर आधारित माहिती असणे आवश्यक आहे.

# मुरूम शहरात रस्त्यालगतचे फुटपाथच केली गायब: अतिक्रमण-पार्किंगच्या विळख्यातून रस्ते कधी मोकळे होणार



धाराशिव(प्रतिनिधी) -मुरूम शहरात अतिक्रमणाचा विषय दिवसेंदिवस भयावह होत चालला आहे. महात्मा बसवेश्वर चौक ते बस स्थानक दरम्यान पादचाऱ्यांसाठी नव्याने तयार करण्यात आलेले फुटपाथ बहुतांश ठिकाणांहून पूर्णपणे गायब झाले आहेत. अनेक ठिकाणी व्यावसायिक व आस्थापनांनी रस्त्यालगत असलेल्या फुटपाथवर अतिक्रमण केल्याने रहदारीचा प्रश्न गंभीर बनला आहे. शहरात अतिक्रमण व बेशिस्त पार्किंगमुळे सातत्याने वाहतूक कोंडी होत असून याचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थी व वृद्ध नागरिकांना बसत आहे.

शहरातील महात्मा बसवेश्वर चौक ते बसस्थानक दरम्यान नव्याने सिमेंट काँक्रीटचा रस्ता तयार करण्यात आला आहे. रस्त्याच्या दोन्ही बाजूला गटार बांधण्यात आले असून या गटारीवर पादचाऱ्यांसाठी फुटपाथ तयार करण्यात आले आहे. मात्र बहुतांश ठिकाणी बाजूच्या व्यवसाईकांनी फुटपाथवर अतिक्रमण करून पत्र्याचे शेड उभे केल्याने फुटपाथ गायब झाले आहे. शहराच्या प्रवेशद्वारावर असलेल्या जिल्हा परिषद कन्या प्रशालेच्या डाव्या बाजूस असलेल्या प्रवेशद्वारा समोर रस्त्यावर अनधिकृत वाळू व्यवसाईकाने वाळू तसेच बांधकाम साहित्य टाकल्याने रस्ता पूर्णपणे बंद झाला असून शाळेत येणाऱ्या विध्यार्थ्यांना अडचण निर्माण होत आहे.

शाळेसमोर रस्त्यावर मोठी अवजड वाहने पार्किंग करण्यात येत असल्याने शाळा सुटल्यानंतर बाहेर पडणाऱ्या विध्यार्थ्यांना रस्ता दिसत नसल्याने रस्ता ओलांडताना या ठिकाणी भविष्यात एखादा अपघात होऊन विध्यार्थ्याला जीव गमावण्याची श्यक्यता नाकारता येत नाही. छत्रपती शिवाजी महाराज चौकात हॉटेल व्यवसायिक, फळ विक्रेते यांच्या दुकानासमोर दुचाकी व चार चाकी वाहने उभी करण्यात येत असल्याने याठिकाणी सातत्याने वाहतुकीची कोंडी होत आहे. यामुळे अक्कलकोट जाणाऱ्या वाहनाला या चौकातून वळसा घेण्यासाठी मोठी अडचण निर्माण होत आहे. प्रशासन याकडे डोळेझाक करत असल्याचा आरोप करण्यात येत असून तातडीने यावर उपाययोजना नाही केल्यास वाहतुकीच्या व शालेय विध्यार्थ्यांना दृष्टीने भविष्यात अतिक्रमणाचा विषय कळीचा मुद्दा ठरणार आहे.

**छत्रपती शिवाजी महाराज चौकात वाहतूक कोंडी**

उमरगा शहराकडून अक्कलकोट जाणाऱ्या वाहनांना छत्रपती शिवाजी महाराज चौकातून वळसा घ्यावा लागतो. याठिकाणी दोन्ही बाजूला फळ विक्रेते हातगाडे उभे करत असल्याने वाहनाला वळसा घेण्यासाठी अडचण होत आहे. वळसा घेताना अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.


लातूर समाचार धाराशिव

बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क

9422472502
9175325708
9284321472


# हरकती फेटाळल्या; मालमत्ताधारक जाणार न्यायालयात: तुळजाभवानी मंदिर विकास आराखडा अंमलाचा पेच

तुळजापूर (प्रतिनिधी)--तीर्थक्षेत्र तुळजापूर येथील श्री तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यासाठी करण्यात येत असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला आता वेग आला आहे. भूसंपादनासाठी प्रस्तावित मालमत्तांबाबत जागामालकांनी दाखल केलेले आक्षेप निकाली काढण्यात आल्याचे भूसंपादन अधिकाऱ्यांनी कळवले आहे. मात्र, या निर्णयामुळे जागामालकांमध्ये नाराजी निर्माण झाली असून, काही मालमत्ताधारक न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत.

तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे भविष्यात वाढणारी भाविकांची संख्या लक्षात घेऊन राज्य शासनाने तब्बल १ हजार ८६६ कोटी रुपयांच्या तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यास मंजुरी दिली आहे. या आराखड्यासाठी मंदिर परिसरातील मोठ्या प्रमाणावर जागा संपादित करण्यात येणार आहे. यासाठी २ ऑगस्ट रोजी खरेदीपूर्व जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्यात आली होती. यामध्ये मंदिर परिसरातील १०५ मालमत्तांचा समावेश करण्यात आला होता. संबंधित मालमत्ताधारकांना ३० दिवसांच्या आत हरकती व म्हणणे मांडण्याचे आवाहन करण्यात आले होते. त्यानुसार सर्व जागामालकांनी मुदतीत आक्षेप दाखल केले होते.

जागामालकांच्या आक्षेपांवर टप्प्याटप्प्याने सुनावणी घेण्यात आली. मात्र, अखेर हे सर्व आक्षेप निकाली काढण्यात येत असल्याचे भूसंपादन अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. त्यामुळे जागामालकांच्या अपेक्षांना धक्का बसला आहे.

मोबदल्याच्या दराबाबत मालमत्ताधारकांत संभ्रम विकास आराखड्यासाठी होणाऱ्या भूसंपादनात योग्य मोबदला देण्यात येईल, असे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे. मात्र, प्रत्यक्षात किती दराने मोबदला मिळणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने मालमत्ताधारकांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. मंदिर परिसरातील मौल्यवान मालमत्ता संपादित होणार असल्याने योग्य मोबदल्यासाठी काही जागामालक न्यायालयात जाण्याच्या तयारीत आहेत.

मंदिर परिसरात २२, ५५८ चौ. मी. जागेचे भूसंपादन तुळजाभवानी मंदिर विकास आराखड्यासाठी मंदिर परिसरातील सुमारे २२ हजार ५५८ चौरस मीटर क्षेत्राचे भूसंपादन प्रस्तावित आहे. यामध्ये आराधवाडी, उंबरझरा, भीमनगर, महाद्वार परिसर, भाजी मंडई, भवानी रोड, खटकाळ गल्ली आदी भागांतील मालमत्तांचा समावेश आहे. याशिवाय हाडको मैदान, आठवडा बाजार आदी भागातील भूसंपादनही स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२९४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४०
२४) २४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४
३०) शिक्षण अधिकारी (माध्यमिक) ०२४७२-२२४१८४

# लोहारा-उमरगा विकासाचा विडा दोन्ही आमदारांनी उचलला: विकासकामांना गती देण्याची ग्वाही




लोहारा (प्रतिनिधी)- -लोहारा आणि उमरगा तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आमदार बसवराज पाटील आणि आमदार अभिमन्यू पवार संयुक्तपणे प्रयत्नशील राहतील, अशी ग्वाही दोन्ही आमदारांनी कानेगाव (ता. लोहारा) येथे आयोजित नागरी सत्कार सोहळ्यात दिली.

विधान परिषदेवर विक्रमी मताधिक्याने निवड झाल्याबद्दल नूतन आमदार बसवराज पाटील यांचा नितीन भैय्या पाटील मित्र मंडळ व कानेगाव ग्रामस्थांच्या वतीने नागरी सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाजपचे ज्येष्ठ कार्यकर्ते कुमारआण्णा कुलकर्णी होते.

यावेळी जिल्हा परिषद सदस्या सुवर्णाताई पाटील, शिवसेना धाराशिव लोकसभा प्रमुख आनंद पाटील, माजी सभापती अश्विनी (नमिता) पाटील, माजी सभापती सिद्रामप्पा दुलंगे, उपसभापती अमोल पाटील, दिलीप भालेराव, प्रकाश आष्टे, पंचायत समिती सदस्य दत्ताभाऊ वाघमारे, नगरसेवक दीपक मुळे, नगरसेवक प्रशांत काळे, सुनीता कदम, सुरेश पाटील, श्रीमंत पाटील तसेच उपसरपंच नितीन पाटील आदी उपस्थित होते.

आमदार बसवराज पाटील आणि औसा मतदारसंघाचे आमदार अभिमन्यू पवार यांचे एकाच वाहनातून आगमन झाले. त्यांचे फटाक्यांच्या आतषबाजीने व जल्लोषात स्वागत करण्यात आले. माजी सभापती अश्विनी पाटील आणि उपसरपंच नितीन पाटील यांच्या हस्ते दोन्ही आमदारांचा दोन जेसीबीच्या साहाय्याने भव्य हार घालून तसेच विठ्ठल-रुक्मिणीची मूर्ती भेट देऊन नागरी सत्कार करण्यात आला.

कानेगाव जिल्हा परिषद गटातील सर्वपक्षीय पदाधिकारी, कार्यकर्ते आणि ग्रामस्थांनीही आमदार बसवराज पाटील यांचा सत्कार केला. कार्यक्रमास तालुक्यातील विविध गावांतील पदाधिकारी, कार्यकर्ते, महिला व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक माजी उपसरपंच नितीन पाटील यांनी केले. सूत्रसंचालन बालाजी कदम यांनी, तर आभार कदम यांनी मानले. यावेळी सचिन फताटे, अभिजित लोभे, हरी लोखंडे, राजेंद्र कदम, सुयश दंडगुळे, परमेश्वर कदम, रोहित सिरसाट, शिवराज संगशेट्टी, अमोल ओवांडकर, श्रीमंत पाटील यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

**राजकारणाकडे शुध्द भावनेने बघा : आ. पाटील**

राजकारणाकडे शुद्ध व चांगल्या भावनेने बघा, आपल्या भागाचा व संपूर्ण मतदारसंघाचा सर्वांगीण विकास झाल्याशिवाय राहणार नाही. कानेगावच्या पाण्याचा प्रश्न मोठा आहे, हा प्रश्न मी व आमदार अभिमन्यू पवार दोघेजण मिळून सोडविल्याशिवाय राहणार नाही. मी महायुतीचा आमदार असल्याने आपण सर्वजण मिळून विकासकामे मोठ्या प्रमाणात या भागाचा विकास केल्याशिवाय राहणार नाही असे आश्वासन नुतन आमदार बसवराज पाटील यांनी नागरी सत्काराला उत्तर देताना केले.

# आठवडी बाजारातील मूलभूत सुविधांच्या मागणीसाठी काँग्रेसचे निवेदन; तातडीने उपाययोजना न झाल्यास आंदोलनाचा इशारा



धाराशिव (शहर प्रतिनिधी शेख अंजुम)- शहरातील आठवडी बाजारात नागरिक, शेतकरी, व्यापारी व ग्राहकांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांबाबत धाराशिव शहर काँग्रेस कमिटीचे (दि.०९) शहराध्यक्ष धनंजय राऊत यांनी जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर व पदाधिकारी यांच्या उपस्थितीमध्ये यांनी नगर परिषद मुख्याधिकाऱ्यांना निवेदन दिले. निवेदनात आठवडी बाजार परिसरात नियमित व प्रभावी स्वच्छता, बाजारासाठी बांधण्यात आलेल्या कठड्यांचा योग्य वापर व नवीन कठडे उभारणे, सिमेंट काँक्रीटचे रस्ते, शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, मुख्य नाल्याचे काम पूर्ण करणे, संपूर्ण परिसरात प्रकाश व्यवस्था, सीसीटीव्ही कॅमेरे व सुरक्षा रक्षकांची नियुक्ती, महिला व पुरुषांसाठी स्वतंत्र स्वच्छतागृहांची नियमित देखभाल, संरक्षण भिंत व मुख्य प्रवेशद्वार उभारणे तसेच ग्राहकांसाठी स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था करण्याची मागणी करण्यात आली आहे. काँग्रेसच्या वतीने प्रशासनाला इशारा देण्यात आला की, या मागण्यांची तातडीने पूर्तता न झाल्यास नागरिकांच्या हितासाठी तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल. यावेळी जिल्हाध्यक्ष उमेश राजे निंबाळकर, शहराध्यक्ष धनंजय राऊत यांच्यासह राजाभाऊ शेरखाने, शीला उंबरे, प्रशांत पाटील, खलील सय्यद, शिवाजी गायकवाड, मेहबूब पटेल, अग्निवेश शिंदे, वसंत मडके, दयानंद पाटील, अशोक बनसोडे, प्रभाकर लोंढे, नरसिंग पवार, अभिमान पेठे, अभिषेक बागल, अझर पठाण, सरफराज काझी, संतोष घोरपडे, पोपट शिंदे, महावीर चव्हाण, संकेत पडवळ, ड. जावेद काझी, विजय मुद्दे, गोरोबा झेंडे, राजेंद्र राऊत, हरिदास शिंदे, भारतराव काटे, सय्यद मन्सूर, बाबा मोमीन, चंद्रकांत जाधव, ड. अरविंद बेडगे, कल्याणकर करपे आणि नानाराव भोसले यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मोटरसायकलला धडक: एकाच गंभीर जखमी होवून मृत्यू

लोहारा (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत मयत नामे बालाजी उत्तम शिंदे, वय ४६ वर्षे, रा.बुध्दनगर नळदुर्ग ता.तुळजापूर जि. धाराशिव हे दि.१६.०६.२०२६ रोजी ०९.३० वा. सु. मोटरसायकल क्र एमएच २५ एएक्स ३६१९ वरुन जात होते. दरम्यान जेवळी येथे कांबळे यांचे घराजवळ रोडवर मोटरसायकल क्र एमएच १२ टीबी ५८४३ चा चालक सतबा हनमंत खोत. रा. विलासपुर पांढरी यानी त्याचे ताब्यातील मोटरसायकल ही हायगईने चालवून बालाजी शिंदे यांचे मोटरसायकलला धडक दिली. या अपघातात बालाजी शिंदे हे गंभीर जखमी होवून मयत झाले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-अरमान बालाजी शिंदे, वय २१ वर्षे, रा. बुध्दनगर नळदुर्ग ता. तुळजापूर जि. धाराशिव यांनी दि.०९.०७.२०२६ रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन लोहारा पो ठाणे येथे भा.न्या.सं. कलम १०६(१), २८१ अन्वये गुन्हा नोंदवला आहे. पोलिस अधिक तपास करीत आहेत.

सांज दैनिक लातूर समाचार हे मुद्रक,प्रकाशक,संपादक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर येथे छापून समर्थनगर धाराशिव येथे प्रकाशित केले आहे.

Evening Daily Latur Samachar is Published by Dayanand Shankar Jade from Samarth Nagar,Dharashiv on behalf of Dayanand Shankar Jade ,edited by Dayanand Shankar Jade and Printed by Dayanand Shankar Jade at Jade Offset Printers,Mitra Nagar,Latur. Editor : Dayanand Shankar Jade Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649